रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १६४
www.ramprahar.com
रविवार, ३१ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### नववर्षाच्या सुरुवातीला थंडीचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज

**पुणे :** राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत आहे. कुठे ढगाळ हवामान, तर कुठे थंडी जाणवत आहे. दरम्यान, नवीन वर्षाच्या सुरुवातीला राज्यातील हवामान नेमके कसे असेल याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली. नवीन वर्षाच्या सुरुवातीला राज्यातील बऱ्याच ठिकाणी ढगाळ वातावरण असणार आहे. त्यामुळे थंडीचे प्रमाण काहीसे कमी राहिल. मराठवाडा वगळता उर्वरित महाराष्ट्रातील कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील १७ तसेच विदर्भातील अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली अशा एकूण २२ जिल्ह्यांत १ ते ७ जानेवारीदरम्यानच्या आठवड्यात फक्त काही ठिकाणीच किंचित ढगाळ वातावरण राहू शकते. या जिल्ह्यांच्या तुरळक ठिकाणी अगदीच किरकोळ पावसाचीही शक्यता आहे, तर मराठवाड्यात ढगाळ वातावरणासह पावसाची शक्यता नसल्याचे खुळे म्हणाले.

अंतरंग
अल्पवयीन मातेची पोलादपूर पोलिसांत तक्रार/२
मुरूड पर्यटन महोत्सवाचे शानदार उद्घाटन/५
खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र दुहेरी मुकुटाचा मानकरी/८

# प्रभू श्रीरामांच्या अयोध्येत विकासपर्व

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते शुभारंभ; विविध सुविधाही उपलब्ध

**अयोध्या : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी (दि.३०) उत्तर प्रदेशातील अयोध्या येथील पुनर्विकसित रेल्वेस्थानकाचे उद्घाटन आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण करण्यात आले. यासोबतच पंतप्रधानांनी अयोध्येसह उत्तर प्रदेशला १५ हजार कोटी रुपयांहून योजना, प्रकल्पांचा शुभारंभ करीत मोठी भेट दिली.

पंतप्रधान मोदींचे अयोध्येत जोरदार स्वागत करण्यात आले. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी विमानतळावर पंतप्रधानांचे स्वागत केले, तर पंतप्रधानांनी भव्य रोड शो केला. या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी लोकांची गर्दी दिसून आली. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी अयोध्यानगरी दुमदुमून गेली होती.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्या रेल्वेस्थानकाच्या उद्घाटनासोबतच दोन नवीन अमृत भारत आणि सहा नवीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवत सहा नव्या रेल्वेगाड्यांचा शुभारंभ केला. या वेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री, दिग्गज नेते उपस्थित होते.

या दरम्यान पंतप्रधान मोदींनी कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले की, एक काळ असा होता की रामलल्ला झोपडीत राहत होते. आता फक्त रामलल्लाच नाही, तर देशातील चार कोटी गरीब जनतेलाही कायमस्वरूपी घर मिळाले आहे. आज संपूर्ण जग २२ जानेवारीच्या ऐतिहासिक क्षणाची आतुरतेने वाट पाहत आहे. अशा स्थितीत अयोध्येतील जनतेमध्ये कमालीचा उत्साह आहे. मीदेखील तुमच्यासारखाच उत्सुक आहे.

### २२ जानेवारीला दिवाळी साजरी करा

अयोध्येतील राम मंदिराचे २२ जानेवारीला लोकार्पण होणार आहे. आज संपूर्ण जग या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची वाट पाहतेय. अशावेळी उत्साह संचारणे स्वाभाविकच आहे. मी देशातील १४० कोटी नागरिकांना आवाहन करतो की, तुम्ही २२ जानेवारी रोजी आपापल्या घरात रामज्योती म्हणजेच दिवा लावून दिवाळी साजरी करा. ती संध्याकाळ पूर्णपणे झगमगित असायला हवी, असे आवाहन पंतप्रधान मोदींनी या वेळी केले.

# थर्टीफर्स्ट सेलिब्रेशन आणि नववर्ष स्वागतासाठी रायगड सज्ज


## पोलीस सतर्क; पार्ट्यांवर राहणार करडी नजर

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्हा सज्ञ झाला आहे. त्याचवेळी हॉटेल्स, कॉटेजेस, फार्महाऊसवर होणाऱ्या पार्ट्यांवर पोलिसांची नजर असणार आहे.

पार्ट्यांमध्ये अमली पदार्थ आढळल्यास कठोर कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यात येणाऱ्या आणि थर्टीफर्स्टनंतर जाणाऱ्या पर्यटकांची तपासणी होणार आहे. महिलांची छेड काढणाऱ्यांवर तसेच बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. वाहनचालकांवर ड्रोन कॅमेऱ्याची नजर राहणार आहे, अशी माहिती रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषेदत दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे सोबत उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारपट्टी असलेली ठिकाणे अलिबाग, मांडवा, काशीद, मुरूड, श्रीवर्धन, दिवेआगर; खालापूर व कर्जत तालुक्यातील फार्महाऊसेस; थंड हवेचे ठिकाण माथेरान या ठिकाणी मुंबई, पुणे, ठाणे या शहरांतून मोठ्या प्रमाणात नववर्ष स्वागतासाठी व पर्यटनासाठी लोक येत असतात. त्यामुळे यंदाही ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस दलाकडून पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या व कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या



दृष्टिकोनातून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांकडे नववर्ष स्वागताच्या दृष्टीने विशेष पथक तयार करण्यात आलेली असून हॉटेल, ढाबे, कॉटेजेस्, फार्महाऊस येथे गैरकृत्य होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. दारू पिऊन धिंगाणा घालणे, दारूच्या नशेत वाहन चालविणे, गैरवर्तन करणे यावर रोख लावण्याकरिता महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस पथके नेमण्यात आलेली आहेत. १५ ठिकाणी ब्रेथ अनालायझरद्वारा तपासणी केली जाणार आहे. महिला सुरक्षेसाठी सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गणवेशातील पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचे पथक नेमण्यात येत आहेत. वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी व नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये याकरिता वाहतूक पोलीस अंमलदार नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांना चाप बसावा याकरिता ब्रेथ अनालायझरचा वापर केला जाईल व लेन तोडणाऱ्यावर कारवाई होईल.

### ड्रग्जवाल्यांनो सावधान!

जिल्ह्यात नुकत्याच सापडलेल्या अमली पदार्थाच्या पार्श्वभूमीवर नववर्षाच्या अनुषंगानेदेखील येणारी सर्व वाहने, फार्महाऊसेस, हॉटेल्स्, लॉजेस्, पार्ट्यांची ठिकाणे, समुद्र किनारपट्टीची ठिकाणे येथे पोलीस ठाण्याकडील साध्या वेशातील पथके व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांमार्फत करडी नजर ठेवण्यात येणार आहे.

**नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस खबरदारी घेत आहेत. नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे. संशयित व्यक्तींवर नजर ठेवावी. आक्षेपार्ह वस्तू किंवा प्रकार आढळून आल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात अथवा पोलीस नियंत्रण कक्षात ०२१४१-२२८४७३, ७४४७७११११०, पोलीस हेल्पलाईन ११२ येथे संपर्क साधावा.**

**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

# वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोचमध्ये बनवली जाणार -उपमुख्यमंत्री फडणवीस

**जालना : प्रतिनिधी**

जालना-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी (दि.३०) दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. या रेल्वेने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालना ते छत्रपती संभाजीनगरदरम्यान प्रवास केला. या संदर्भात बोलताना त्यांनी संपूर्ण भारतीय बनावटीची ही ट्रेन पुढील काळात लातूर येथील कोचमधून बनवण्यात येणार आहे. लातूर व मराठवाड्यासाठी ही अभिमानाची बाब आहे, असे म्हटले.



जालना येथील उद्घाटनाच्या कार्यक्रमास्थळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जालना येथून आज वंदे भारत ही आधुनिक भारताची ट्रेन सुरू झाली आहे. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार. वंदे भारत रेल्वे ही प्रगत राष्ट्रातील सर्व अत्याधुनिक सुविधांयुक्त रेल्वेप्रमाणे आहे. महाराष्ट्रात सध्या सहावी वंदे भारत ट्रेन जालन्यातून सुरू झाली आहेत. याबद्दल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचेही आभार व्यक्त करतो. महाराष्ट्रात सध्या रेल्वेच्या पायाभूत सुविधांची एक लाख सहा हजार कोटींची कामे सुरू आहेत. या वर्षी १३ हजार कोटी रुपये राज्याला मिळाले आहेत. अशा प्रकारे रेल्वेचा अभूतपूर्व विस्तार करण्यात येत आहे.

# 'मुंबई ते अयोध्या रेल्वे सुरू व्हावी'

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईहून अयोध्या अशी रेल्वे सुरू व्हावी अशी महाराष्ट्रातील नागरिकांची इच्छा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

जालना-मुंबई वंदे भारत रेल्वेगाडी छत्रपती शिवाजी टर्मिनल स्थानकात आली. या रेल्वेचे स्वागत करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे स्थानकात उपस्थित होते. त्यांच्यासमवेत खासदार राहुल शेवाळे देखील होते. त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. त्यांनी मुंबई ते अयोध्या रेल्वेदेखील सुरू करण्याची विनंती रेल्वे मंत्रालयाला केली आणि उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

## निवडक

### मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार

**जयपूर :** राजस्थानमधील भाजप सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार शनिवारी (दि. ३०) करण्यात आला. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या मंत्रिमंडळात २२ जणांनी मंत्री म्हणून शपथ घेतली आहे. याआधी शर्मा यांनी मुख्यमंत्री म्हणून, तर दियाकुमारी आणि प्रेमचंद बैरवा यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.

### इम्रान खान यांना निवडणूक आयोगाने उमेदवारी नाकारली

**इस्लामाबाद :** पंतप्रधान इम्रान खान पाकिस्तानमध्ये २०२४मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लढू शकणार नाहीत. पाकिस्तानच्या निवडणूक आयोगाने त्यांचा अर्ज फेटाळला आहे. वृत्तसंस्था रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार पाकिस्तान निवडणूक आयोगाने शनिवारी (दि.३०) ही माहिती दिली. ७१ वर्षीय इम्रान खान एप्रिल २०२२मध्ये पंतप्रधानपदावरून हटल्यानंतर राजकीय आणि कायदेशीर लढाईत अडकले आहेत.

# ताम्हिणी घाटात पर्यटकांची बस उलटली

## दोन ठार, ५५ जण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे कोथरूड परिसरातून रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वरकडे पर्यटनासाठी निघालेल्या कर्मचाऱ्यांची खासगी ट्रॅव्हल बस शनिवारी (दि.३१) सकाळी ताम्हिणी घाटात माणगाव तालुक्यातील कोंडेथर गावच्या हद्दीत उलटली. या भीषण अपघातात दोन व्यक्ती जागीच ठार, तर ५५ प्रवासी जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन्ही महिलांचा समावेश आहे.

वेगवेगळ्या कंपन्यामध्ये काम करणारे कर्मचारी दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथे पर्यटनासाठी साई गणराज या खासगी ट्रॅव्हलच्या बसने (एमएच ०४-एफके ६२९९) निघाले होते. त्यांची बस शनिवारी सकाळी ७.३०च्या सुमारास ताम्हिणी घाटातील कोंडेथर गावच्या हद्दीतील वळणावर आली असता चालकाचे नियंत्रण सुटून उलटली.

अपघातग्रस्त बसमधून ५७ प्रवासी प्रवास करीत होते. यातील सुरभी रवींद्र


(छाया : सलीम शेख)

मोरे (वय २३) आणि कांजन मारुती मांजरे (वय २०) या दोघींचा जागीच मृत्यू झाला; तर उर्वरित ३२ पुरुष व २३ महिला असे एकूण ५५ पर्यटक प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये क्षितेज प्रकाश सोमवंशी, जितेश विठ्ठलसिंग राजपूत, भावेश कैलास पाटील, योगेश चंद्रकांत, लोकेन्द्र सिंग राजपूत, धीरज बाबू मिस्त्री, हेमंत नाना गोसावी, सुरज संजय टेकले, कल्पेश देविदास कदम, मनोज उत्तम वाघे, अक्षय प्रभाकर आडे, तेजस अनिल पाटील, आशिष लक्ष्मण राऊत, तुषार हिरामण महाजन, आवेश साजिद खाटीक, उमेश रमेश बाबळसुरे, सुरज माधवराव गाडेकर, सचिन हितेंद्र गिरासे, मयूर रमेश चौधरी, अनिकेत सुरेश वाघुळे, प्रतीक प्रकाश लांडगे, राहुल मारुती सुरकार, रोहित तायप्पा खांडेकर, सचिन बळीराम बिसेन, तेजस गुलाब सूर्यवंशी, भावेश कैलास पाटील, संदीप खंडेराव पवार, मंदार सुधाकर दांडवळे, सागर राजू नवले, अजय हिरालाल पाटील, भैरवनाथ दत्तात्रय कुंभार (चालक), अमोल दिलीप सुरवसे (क्लिनर), प्रियंका नंदकुमार शिंदे, सोनाली दिनेश मेश्राम, अंकिता बळवंतराव वडगावकर, दामिनी संजय गिरासे, लक्ष्मी किरण मोरे, दिशा ओमकार दियेवर, स्वीटी सुभाषराव चिखले, दिव्या अनिल राऊत, शितल अरविंद गायकवाड, प्रिती ईश्वर लांडगे, तेजस्विनी गजेंद्र पाटील, साक्षी उत्तम दरेकर, सुनंदा रामराव जोडताले, गंगुबाई उत्तम रेड्डी मालेगावकर, मंगल मारुती नेरलेवाड, पायल रमेश पवार, योगिता कल्पेश कदम, दिपाली भीमराज पोकळे, प्रिया सोपान सोनवणे, मोहिनी विनोद सोनटक्के, आकांक्षा धनाजी सोनटक्के, योगेश्वरी लवमेश्वर ईसापुरे, सोनाली रामचंद्र पचारे यांचा समावेश असून जखमींवर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या अपघातप्रकरणी वाहनचालक भैरवनाथ कुंभार याच्यावर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काँग्रेस नेते सुनील केदार कारागृहातच राहणार!

## सत्र न्यायालयाने फेटाळला जामीन



**नागपूर : प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १५० कोटी रुपयांचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा करणारे काँग्रेस नेते, माजी मंत्री सुनील केदार यांना शनिवारी (दि. ३०) जोरदार दणका बसला. त्यांची दोषसिद्धीला स्थगिती आणि शिक्षा निलंबन व जामीन देण्याची विनंती सत्र न्यायालयाने नामंजूर केली. त्यामुळे आमदारकी परत मिळविण्याचे केदार यांचे मनसुबे उधळले गेले.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर.एस. पाटील (भोसले) यांनी हा निर्णय देताना, केदार यांना दिलेली शिक्षा चुकीची असल्याचे कुठलेही पुरावे सादर केले गेले नाही. त्यामुळे त्यांना जामीन दिल्याने समाजात चुकीचा संदेश जाईल, असे सांगत जामीन फेटाळला. मागील आठवड्यात ट्रायल कोर्टाने केदार यांच्यासह सहा आरोपींना पाच वर्षांची शिक्षा ठोठावली होती. यानंतर मंगळवारपासून सत्र न्यायालयात दोषसिद्धीला स्थगितीसह जामिनावर सुनावणी सुरू होती. केदार यांच्यासह एक अन्य आरोपी अशोक चौधरी यांचाही जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. इतर आरोपींच्या जामिनावर २ जानेवारीला सुनावणी होईल.

# सर्वंकष स्वच्छता मोहीम लोकचळवळ व्हावी -मुख्यमंत्री

**ठाणे : प्रतिनिधी**

सर्वंकष स्वच्छता मोहीम ही लोकचळवळ व्हावी हे अभियान मुंबई, मुंबई महानगर, एमएमआरडी क्षेत्र असे टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यभर राबविण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.३०) येथे केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील सर्वंकष स्वच्छता मोहिमेची सुरुवात वागळे प्रभाग समिती कार्यक्षेत्रातून करण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. या मोहिमेत मुख्यमंत्री स्वतः सहभागी झाले होते.

या मोहिमेवेळी महापालिका आयुक्त अभिजित बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर नरेश म्हस्के, माजी नगरसेवक अशोक वैती, एकनाथ भोईर, योगेश जानकर, डॉ.जितेंद्र वाघ,



एकता भोईर, संध्या मोरे, शिल्पा वाघ, मनिषा कांबळे, महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक संघ, भजनी मंडळे, डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, अनिरुद्ध बापू सेवा मंडळ, संत निरंकारी सेवा मंडळ, स्वामी समर्थ सेवा मंडळ, विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, ठाण्यातील प्रदूषण तुलनेने कमी असून ते आणखी कमी करण्यासाठी जिथे जिथे जागा मिळेल तेथे झाडे लावून हरीत पट्टे तयार करावेत, जेणेकरून ऑक्सिजन पार्क तयार होतील तसेच मियावाकी पद्धतीने वृक्षलागवड करून शहरात जंगले तयार करावीत. त्यामुळे हवेतील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. जिथे स्वच्छता असेल तेथे लोक कचरा टाकत नाही. आज बीएमसी पाईपलाईन येथे साठलेला कचरा साफ केला जातो आहे, त्या ठिकाणी ग्रीन पॅच तयार करून तो परिसर हिरवागार करा, जेणेकरून त्याचे दृश्य स्वरूप नागरिकांना दिसेल.

ठाण्यातील वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना होऊ नये यासाठी वाहतुकीचे नियोजन करावे, त्याचप्रमाणे फेरीवाल्यांना हॉकर्स झोनमध्ये जागा उपलब्ध करण्याचे नियोजन करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले. स्वच्छता अभियानाचे ठाणे महापालिकेने केलेले नियोजन हे उत्कृष्ट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी विशेषत्वाने नमूद केले.





### दिनदर्शिका प्रकाशन

**पनवेल : भाजपच्या वतीने महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती मनोहर म्हात्रे तसेच माजी नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली व राजेश भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या उत्कर्ष सांस्कृतिक, कला, क्रीडा मंडळाच्या वतीने २०२४ सालची दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.**

**या दिनदर्शिकांचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, विकास घरत, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, माजी पं.स. सदस्य राज पाटील, उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष राकेश भुजबळ, नितीन भुजबळ, चंद्रकांत पट्टेबहादूर, किशोर शिंदे, क्रांतिकुमार चितळे, सिद्धेश भुजबळ, पप्पू साळवे, आकाश गुंजाळ, बाळू गवई, अमित लोंढे, संदेश ढवळे आदी उपस्थित होते.**

(छाया : विकास म्हात्रे)

# मुंबई पोलिसांचे ऑल आऊट ऑपरेशन

## २३ फरार आणि वॉन्टेड आरोपींना अटक


(संग्रहित छायाचित्र)

**मुंबई : प्रतिनिधी**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येच्या जल्लोषात विघ्न येऊ नये यासाठी मुंबई पोलिसांनी शहरात शुक्रवारी (दि. २९) रात्री उशीरा ऑल आऊट ऑपरेशन मोहीम राबवली. या कारवाईत पोलिसांनी २३ फरार आणि वॉन्टेड आरोपींना अटक केले.

२१७ ठिकाणी कोंबिंग ऑपरेशन करण्यात आले, तर ७९६४ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या १८०७ जणांवर, तर १३५५ चालकांवर मोटर वाहन कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आली. या वेळी ६३ मद्यपी चालकांवरही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सरत्या वर्षाला निरोप देताना तसेच नवीन वर्षांचे स्वागत करण्यासाठी एकीकडे नागरिक सज्ज झाले असताना मुंबई पोलिसांनी शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी शुक्रवारी रात्री ११ वाजता अचानक ऑल आऊट ऑपरेशन मोहीम सुरु केली. रात्री तीन वाजेपर्यंत ते ऑपरेशन सुरू होते.

या वेळी पाच प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, तेरा पोलीस उपायुक्त, ४१ सहाय्यक पोलीस आयुक्त आणि ९३ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या हद्दीत विशेष मोहीम हाती घेतली होती. पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी पोलीस ठाणे, नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान विविध ठिकाणी भेट देऊन पोलिसांना मार्गदर्शन केले.

या कारवाईदरम्यान अभिलेखावरील वॉन्टेड व फरार असलेले एकूण ८८७ आरोपी तपासण्यात आले, त्यात २३ आरोपी विविध गुन्ह्यांत फरार आणि विविध गुन्ह्यांत आरोपी असलेल्यांना अटक करण्यात आली. अजामिनपात्र वॉरंट बजावून ७७ जणांना तसेच एनडीपीएस कलमांतर्गत १०४ जणांना अटक करण्यात आली. महिलांविरोधातील गुन्हे तसेच गंभीर गुन्ह्यांतील ३१ आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. सराईत चोरांच्या टोळीविरोधात दोन कारवाया करण्यात आल्या. अवैध शस्त्रे बाळगल्याप्रकरणी ४९ जणांवर कारवाई करुन त्यांच्याकडील शस्त्रे जप्त करण्यात आले.

सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११२ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. त्यात ७९६४ दुचाकी आणि चारचाकी वाहने तपासण्यात आली. या वेळी मोटार वाहन कायदा कलमांतर्गत १३५५ चालकांवर कारवाई करण्यात आली. विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या १८०६ जणांवर, तर ६३ मद्यपी चालकांवर कारवाई करण्यात आली.

**कोम्बिंग ऑपरेशन**

सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत २१७ ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले. अवैध दारू विक्रीची ९५ ठिकाणे व जुगाराच्या अड्ड्यावर छापे टाकण्यात आले. त्यात ६३ जणांना अटक करण्यात आली. तडीपार करण्यात आलेल्या ५० आरोपींना बेकायदा राहत असल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. या प्रकरणी एकूण १२३ जणांवर तसेच २६४ फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली. अभिलेखावरील ६१६ आरोपी तपासण्यात आले. त्यातील ९० आरोपी मिळून आले. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

# अल्पवयीन मातेची पोलादपूर पोलिसांत तक्रार

## सासर, माहेरच्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

खेड (जि.रत्नागिरी) येथील जैतापूर धनगरवाडी येथील माहेरवाशिण असलेल्या अल्पवयीन नाबालिकेसोबत तिचे आई-वडील व सासू-सासरे यांनी संगनमताने तिचा विवाह लावला, ती गरोदर झाल्याच्या घटनेनंतर नाबालिकमातेने पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली. त्यानुसार नवऱ्यासह सासू, सासरे, आई, वडील, यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांनी दिली.

सध्या खेड येथील जैतापूर धनगरवाडी येथे माहेरी वास्तव्यास असलेल्या १७ वर्षे तीन महिन्यांच्या नाबालिक मातेने तिच्या आई शेवंती नारायण भंडारे आणि वडील नारायण राया भंडारे यांनी तिचे वय कमी असल्याचे माहिती असूनही तिचा विवाह पोलादपूर तालुक्यातील पळचिल येथील सुनील काशिराम बर्गे यांच्यासोबत लावून दिल्यानंतर तिच्या नवऱ्याने ती अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही २४ मार्च ते २४ एप्रिल २०२३दरम्यान तिच्यासोबत वारंवार शारिरीक संबंध ठेवले.

याबाबत तिचे सासरे काशिराम बाबू बर्गे आणि सासू सीताबाई काशिराम बर्गे यांना ती अल्पवयीन असल्याने तिच्यासोबत तिचा नवरा असलेल्या पतीचे शारिरीक संबंध कायद्याने गुन्हा असल्याची माहिती असूनही त्यांनी त्यास तसे करू दिले. यामुळे तिची गर्भवती राहिली आणि तिची २८ डिसेंबर २०२३ रोजी प्रसुती झाली. तिला प्रसुतीवेळी पुत्ररत्न झाले.

विवाह मुलगी केवळ १७ वर्षे सहा महिने वयाची असल्याने हा बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ कलम ९, १०, ११ कलमांनुसार अवैध ठरत असल्याने तिच्या नवऱ्यासह सासू, सासरे, आई, वडील हे पाचजण आरोपी करण्यात आले असून पाचही जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा र.नं. १४७-२०२३ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

अद्याप या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक यु.एल.धुमास्कर यांनी दिली.

# बस-डंपरचा भीषण अपघात

## दोन जण ठार, १५ प्रवासी जखमी



**विक्रमगड : प्रतिनिधी**

विक्रमगड-मनोर मार्गावरील केव फाटा जवळ हायवा(ट्रक)-बस एकमेकांना धडकून भिषण अपघात झाला. या अपघातात पंधरा प्रवासी गंभीर जखमी झाले. तर दोन मुलांचा मृत्यू झाला. मनोर कडून विक्रमगडकडे जाणारी हायवा तर विक्रमगड कडून मनोर कडे जाणारी पालघर-शिर्डी बस केव फाटा येथे समोरासमोर धडक बसल्याने हा अपघात झाला.

पालघर-शिर्डी बस व हायवा (ट्रक) दुपारी १.३० च्या सुमारास मनोर-विक्रमगड मार्गावरील केव फाटा जवळ वळणावर एकमेकांना धडकल्या. यात १५ प्रवासी गंभीर जख्मी झाले असुन. जखमींना स्थानिकांनी बसमधून बाहेर काढून मनोर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहे.

जखमींवर मनोर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून, अनेक प्रवासी गंभीर जख्मी आहेत. तर हा अपघात इतका गंभीर होता की या अपघातात बसची केबीन व एक बाजू चक्का-चूर झाली आहे.

# राम मंदिर लोकार्पण श्रद्धेचा उत्सव -आमदार आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत राम मंदिराचा राजकीय इव्हेंट होऊच नये आणि कुणी तसे करतही नाही. हा श्रद्धेचा उत्सव आहे, असे सांगितले.

ते पुढे म्हणाले की, इतके वर्षे भारतीय मनामध्ये जे साठले आहे त्याचा उत्सव आहे. या आनंद उत्सवामध्ये सर्वांना सहभागी झाले पाहिजे ही आमची भूमिका आहे. ज्यांचा या उत्सवामध्ये तिळमात्र संबंध नाही त्यात निमंत्रित नसलेल्यांमध्ये उद्धव ठाकरे यांचा समावेश आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे बोलणे हा थयथयाट आहे, असेही शेलार म्हणाले.

महायुतीच्या जागा वाटपासंबंधी निर्णय तिन्ही पक्षाची नेते घेतील. ज्या पद्धतीचा कलगीतुरा ठेवणीतले शब्द दाखवण्याचे काम संजय राऊत करत आहेत. त्यावरून हे स्पष्ट होते की, संजय राऊत यांना काँग्रेसचे लोक सहन करतील असे वाटत नाही परंतु तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. आमच्याकडे चर्चा, विमर्श चालू आहे. तिन्ही नेते आपली भूमिका स्पष्ट करतील, असेही शेलार या वेळी म्हणाले.

# महाराष्ट्रात एक कोटी विकसित भारत अँबेसेडर बनवण्याचे लक्ष्य

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यभरात प्रदेश भाजपतर्फे एक कोटी पेक्षा अधिक विकसित भारत अँबेसेडर बनविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याची माहिती भाजपाच्या नमो ॲप अभियानाचे राष्ट्रीय संयोजक कुलजीत सिंग चहल यांनी शनिवारी (दि. ३०) दिली.



भाजप प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या दादर येथील वसंत स्मृती कार्यालयात झालेल्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. चहल यांनी विकसित भारत अँबेसेडर अभियानाची माहिती दिली. या वेळी भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख व विकसित भारत ब्रँड अँबेसेडर अभियान प्रदेश संयोजक नवनाथ बन उपस्थित होते.

श्री. चहल म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकसित भारत संकल्पासोबत हे विकसित भारत ब्रँड अँबेसेडर जोडले जातील. मोदी सरकारच्या महत्वाकांक्षी कल्याणकारी योजनांचा लाभ समाजाच्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे अँबेसेडर करणार आहेत. भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता असे कमित कमी १० अँबेसेडर बनवेल असेही श्री.चहल यांनी नमूद केले. ज्या लाभार्थ्यांना मोदी सरकारच्या योजनांचा लाभ झाला त्या सर्वानी या मोहिमेत सहभाग घ्यावा, असे आवाहन ही श्री.चहल यांनी केले. प्रदेश भाजपा ने १ कोटी विकसित भारत अँबेसेडर बनवण्याचे लक्ष्य साध्य करण्याचा निर्धार व्यक्त केल्याबद्दल श्री. चहल यांनी समाधान व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करावा -विश्वनाथ कोळी

## गव्हाण विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाणून तो अधिक वृद्धिंगत करावा आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनी केले.

विद्यालयाच्या शालेय विज्ञान प्रदर्शना च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना विश्वनाथ कोळी यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अनेक वैज्ञानिक प्रतिकृतींचे कौतुक करून यातूनच भविष्यातील लक्षवेधी वैज्ञानिक संशोधक निर्माण होतील, असा आशावाद व्यक्त केला.

रयत शिक्षण संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील शालेय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या शालेय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते झाले.





या वेळी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी या विज्ञान प्रदर्शनातील प्रत्येक प्रतिकृती बद्दलची माहिती विद्यार्थ्यांकडून घेतली. प्रतिकृती तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांनीदेखील आपण तयार केलेल्या प्रतिकृतींचे सादरीकरण अतिशय उत्तम रित्या मराठी व इंग्रजी या भाषांमधून केले. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

उद्घाटन समारंभात विद्यालयाच्या अटल टिंकरिंग विभागाचे प्रमुख आणि संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी प्रास्ताविक भाषणात विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक वैज्ञानिक जाणीवा अधिक रुंदावण्याचे आवाहन केले. याचप्रमाणे विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी विज्ञान प्रदर्शनातील सर्व प्रतिकृतींची पाहणी केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे कौतुक करून त्यांच्या वैज्ञानिक क्षितिजा वरील भावी कामगिरीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी या विज्ञान प्रदर्शनाचे प्रमुख आयोजक विद्यालयाचे गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, विज्ञानाध्यापिका चित्रलेखा पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर,सागर रंधवे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. उद्घाटन आणि समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक सागरकुमार रंधवे यांनी केले.

# आई धोरणांतर्गत एमटीडीसीच्या पर्यटक निवासांमध्ये महिलांसाठी ५० टक्के सवलत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १९ जून २०२३ रोजीच्या 'आई' महिला केंद्रित/लिंग समावेशक पर्यटन धोरणानुसार महिला पर्यटकांसाठी आणि महिला उद्योजकांसाठी एमटीडीसीच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. या धोरणाचा भाग म्हणून आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर १ ते ८ मार्च २०२४ हे आठ दिवस महामंडळाच्या सर्वोत्कृष्ट पर्यटक निवासांमध्ये महिलांसाठी ५० टक्के इतकी सूट देण्यात येणार आहे, अशी माहिती पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

मंत्री महाजन म्हणाले, एमटीडीसीची रिसॉर्ट्स/पर्यटक निवासे ही राज्याच्या कानकोपऱ्यात महत्त्वाच्या ठिकाणी वसलेली आहेत. महामंडळाची एकूण ३४ पर्यटन निवासे, २७ उपहारगृहे असून, निवास व न्याहारी, महाभ्रमण, कलाग्राम, अभ्यागत केंद्र, इको टुरिझम यांसारखे अनुभवात्मक उपक्रम आहेत तसेच अलिकडेच जबाबदार पर्यटन अंतर्गत एमटीडीसीने मोठ्या प्रमाणात वाटचाल सु केली आहे. त्याचप्रमाणे बीच रिसोर्ट, हिल रिसोर्ट, जंगल रिसोर्ट असे विविध पद्धतीचे पर्यटक निवास व उपहारगृहे तसेच बोट क्लब, स्कूबा डायविंग जलक्रीडा केंद्र पर्यटकांना आकर्षित करतात.

महाराष्ट्र राज्य पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे राज्य आहे. महाराष्ट्र हे देशातील असे एकमेव राज्य आहे, ज्यामध्ये सहा जागतिक वारसास्थळे, ८५०हून अधिक लेण्या, ४००च्या जवळपास दुर्ग व गडकिल्ले आहेत. तसेच महाराष्ट्र विविध पर्वत रांगा, राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्य, समुद्रकिनारे, नद्या, सांस्कृतिक वारसा, रुढी, परंपरा, वेशभूषा, सण, उत्सव यांनी समृद्ध आहे. महाराष्ट्रातील ही प्रेक्षणीय, निसर्गरम्य, ऐतिहासिक स्थळे देशी आणि विदेशी पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतात. १९७५मध्ये स्थापन झाल्यापासून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही संपूर्ण महाराष्ट्रामधील प्रथम क्रमांकाची आणि कायम अग्रस्थानी येणारी पर्यटन संस्था आहे. 'अतिथी देवो भव' या मूल्यांची पुरेपूर अंमलबजावणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सर्व पर्यटक निवासांमध्ये केली जाते. रिसॉर्टस आणि पर्यटक निवासामध्ये येणाऱ्या पर्यटकांचे आदरातिथ्य उत्तमरित्या करणारे महाराष्ट्रामधील नामवंत महामंडळ म्हणून एमटीडीसीकडे पाहिले जाते. महिलांसाठीच्या सवलतीचा लाभ पर्यटकांनी घ्यावा, असे आवाहन मंत्री महाजन यांनी केले आहे.

या संधीचा लाभ घेण्याकरिता महामंडळाच्या www.mtdc.co. या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी. यासाठी नियम व अटी आहेत. आपले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ही सवलत केवळ महिला पर्यटकांसाठी आहे. महिला पर्यटक निवासात प्रवेश करताना (चेक-इनच्या) वेळी उपस्थित असणे अनिवार्य आहे. ही सवलत १ ते ८ मार्च या कालावधीसाठी वैध असेल. सवलत, कॉन्फरन्स हॉल, लॉन्स, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, ऑडिटोरियम यांना लागू नाही. सवलतीमध्ये नाश्त्याचा समावेश नाही.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने राज्यात येत्या १४ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यातील केंद्र सरकार तसेच राज्य शासनाच्या राज्यस्तरीय, विभागीय आणि जिल्हास्तरीय शासकीय आणि अधिनस्त कार्यालयांनी मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना मराठी भाषा विभागामार्फत करण्यात आली आहे.

या कालावधीत सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेसंबंधी परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिर, कवीसंमेलन, नाट्य, घोषवाक्य, अभिवाचन, कथाकथन, पुस्तकांचे रसग्रहण, वादविवाद यांसारख्या स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने अभिजात ग्रंथांचा परिचय करून देण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करावे. याशिवाय मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता विविध माध्यमांतून याबाबतचे दृक श्राव्य संदेश प्रसारित करावेत. ग्रंथ प्रदर्शन, दिंडी, पुस्तक भेट देणे, पुस्तक जत्रा, समाजमाध्यमांवर मराठी वाचन कट्टा आदी उपक्रम आयोजित करण्यात यावेत, असे या अनुषंगाने काढलेल्या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

मराठी भाषेच्या प्रसार प्रचारासह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी अनुवाद लेखन, व्यावसायिक लेखन, पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया, स्व-प्रकाशन, ई बुक, ऑनलाईन विक्री, लेखक प्रकाशक करार, संहिता लेखन, लघुपट, माहितीपट लेखन आदी विषयांवरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशीही सूचना करण्यात आली आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्याबरोबरच महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, कोकण मराठी साहित्य परिषद, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, मुंबई मराठी साहित्य संघ आदी साहित्य सस्थांची मदत घेता येणार असल्याचे मराठी भाषा विभागाने स्पष्ट केले आहे.

## दुखवटा

### धोंडू वाजे



**नागोठणे :** नागोठणे के.एम.जी.विभागातील सामाजिक कार्यकर्ते रवींद्र वाजे यांचे वडील धोंडू काशिनाथ वाजे (वय ७२) यांचे शनिवारी (दि. २३) गवळआळी येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुन, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. धोंडू वाजे यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. १) सकाळी ९ वाजता के.एम.जी. नागोठणे (दशक्रिया शेड) येथे होईल व उत्तरकार्य विधी गुरूवारी (दि. ४) सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत नागोठणे, गवळआळी येथे घरी होणार आहे.

### विठ्ठल पाटील

**पेण :** दैनिक पुण्यनगरीचे पेण प्रतिनिधी संतोष विठ्ठल पाटील यांचे वडील नाट्यकर्मी



विठ्ठल नथुराम पाटील (वय ८०) यांनी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन विवाहित मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. विठ्ठल पाटील यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. ७) उद्धर येथे होईल. उत्तरकार्य मंगळवारी (दि. ९) हमरापूर येथील निवासस्थानी होणार आहे.

# नवीन पनवेलमध्ये पाण्याची नासाडी

## सेक्टर ३, ४, ८, ९ व १०मध्ये खोदकामांमुळे जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार




**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल सेक्टर ३,४,८,९,१० परिसरात जागोजागी महानगरकंपनीचे पाईपलाईन टाकण्याची कामे सुरू आहे. या खोद कामे करताना पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्यांकडे कंत्राटदारांकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे या परिसरात भूमीगत रस्त्याखालून जाणाऱ्या जलवाहिन्या फुटून हजारो लिटर पाणी वाया जाण्याच्या घटना या परिसरात नेहमीच घडत आहेत.

यासंदर्भात माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी सांगितले की, महानगर गॅसची लाईन टाकणाऱ्या ठेकेदारावर कोणाचेही नियंत्रण दिसत नाही. ठेकेदार रस्ता खोदताना सोसायटीवाल्यांना विश्वासात घेत नाही. त्यामुळे एक गेट असलेल्या सोसायटीतील नागरिकांचे हाल होत आहेत. काम करताना अनेक ठिकाणी पाण्याची पाईपलाईन फुटली जाते. ती दुरुस्त करेपर्यंत या सेक्टर मधील नागरिकांचे पाण्याचे हाल होत आहेत.

गेल्या दहा महिन्यापूर्वी नवीन पनवेल येथिल डीएव्ही शाळेसमोरच्या रस्त्यावर सिध्द विनायक सोसायटीसमोर रस्त्याचे खोदकाम करताना जलवाहिनी फूटून हजारो लिटर पिण्याच्या पाण्याची नासाडी झाली. आज पुन्हा सेक्टर ३ येथील निल रेसिडेंसी सोसायटी समोर जलवाहिनी फूटली असून हजारो लिटर पिण्याच्या पाण्याची नासाडी होत आहे. यामुळे येथिल नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नवीन पनवेलचा पाणीप्रश्न जटिल झाला असून पाण्यावाचून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. पाणीटंचाई प्रश्नी गेल्या आठ दिवसापूर्वी येथिल नागरिकांनी नवीन पनवेल सिडको कार्यालयाला धडक दिली होती.

नवीन पनवेलमध्ये बऱ्याच भागात नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे सिडको प्रशासनाच्या व महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीमुळे पाईपलाईन फुटून हजारो लिटर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत आहे. यामुळे येथील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पाहायला मिळत आहे.

**खोदताना बाहेर काढलेली माती तिथेच ठेवल्याने सगळीकडे धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे प्रदूषण वाढले आहे. त्याचा त्रास शाळेत जाणाऱ्या मुलांना होत आहे. या कामासाठी खणलेले खड्डे किती दिवसात भरण्यात येणार आहेत. हा रस्ता कोण व किती दिवसांत दुरुस्त करणार याचा खुलासा करणे आवश्यक आहे.**
**–प्रकाश बिनेदार, माजी नगरसेवक**

# जेएनपीएतून पावणे सहा कोटींचे सिगारेट्स जप्त

**उरण : रामप्रहर वृत्त**

महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) न्हावा–शेवा बंदरात आलेल्या एका कंटेनरमधून पाच कोटी ७७ लाख रुपये किमतीच्या तब्बल ३३ लाख ९२ हजार सिगारेट जप्त केल्या आहेत. चिंचेच्या पेटीमध्ये लपवून या सिगारेट्स परदेशातून तस्करी करून आणण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. डीआरआयने आता या सिगारेटच्या तस्करीमध्ये गुंतलेल्या तस्करांचा शोध सुरु केला आहे.

जवाहरलाल नेहरू बंदरात परदेशातून आलेल्या व न्हावा शेवा येथील कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस)मध्ये ठेवण्यात आलेल्या एका ४० फूट कंटेनरमध्ये सिगारेटचा साठा लपवून आणण्यात आल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. या माहितीच्या आधारे डीआरआयच्या पथकाने गुरुवारी न्हावा शेवा येथील कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) मध्ये ठेवण्यात आलेल्या ४० फूट रेफ्रिजरेटेड कंटेनरची तपासणी केली. या तपासणीत चिंचेच्या पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये सिगारेटची पाकिटे लपवून ठेवल्याचे आढळून आले.

चिंचेच्या पुठ्ठ्यांचे बॉक्स उघडल्यानंतरदेखील सिगारेटची पाकिटे सापडू नयेत, यासाठी चिंचेच्या पेट्याच्या आतमध्ये सिगारेटची पाकिटे लपवून ठेवण्यात आली होती. या कारवाईत डीआरआयच्या पथकाने या कंटेनरमधून ३३ लाख ९२ हजार सिगारेट्सचा साठा जप्त केला आहे. या सिगारेट्सची बाजारातील किंमत सुमारे पाच कोटी ७७ लाख इतकी आहे.

### आयात शुल्क टाळण्यासाठी तस्करी

सिगारेट ओढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतो. त्यामुळे देशाच्या आरोग्याच्या पायाभूत सुविधांवर भार पडत असल्याने सरकार अशा वस्तूंवर जास्त शुल्क आकारते. तंबाखूसारख्या उत्पादनांचे आयात करण्यासाठी लागणारे जास्त शुल्क टाळण्यासाठी छुप्या पद्धतीने तस्करीच्या मार्गाने सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थ आणण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले.



# जासई येथील विद्यालयात विज्ञान प्रदर्शन

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये सन २०२३ – २४ मधील शाळा पातळीवरील विज्ञान प्रदर्शन झाले.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते झाले. त्यांनी चंद्रयान रॉकेट या नववी गुरुकुलमधील साहिल पाटील या विद्यार्थ्यांने निर्माण केलेल्या प्रयोगाची कळ दाबून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्रमुख पाहुण्यांनी प्रयोगांचे निरीक्षण करून शाळेतील बाल वैज्ञानिकांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.



विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर श्री अरुण घाग यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्या सोबत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख मार्गदर्शक के. एम. म्हात्रे, डी. पी. सोनवणे, राजन घरत हे उपस्थित होते. उपमुख्याध्यापिका एस.एस. पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व वर्गशिक्षक, विज्ञान शिक्षक, सर्व सेवक वर्ग व सर्व विद्यार्थ्यांनी हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी केले.

# पनवेलमध्ये आज अक्षता कलश यात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच्या माध्यमातून सर्वच ठिकाणी होणारी मंगल अक्षता कलश यात्रा पनवेलमध्येही होणार आहे. रविवारी (दि. ३१) या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

हिंदू मनाचा मानबिंदू प्रभू श्री रामाची अयोध्येत नवीन उभे राहत असलेल्या मंदिरात प्रतिष्ठापना २२ जानेवारी रोजी होत आहे. त्या निमित्ताने श्री राम अक्षता कलश पनवेल तालुक्यात येणार आहे. श्रीराम जन्मभूमी अक्षता कलश यात्रेत सहभागी होण्यासाठी आपण सर्व श्री राम भक्तांनी रविवारी सकाळी ९ वाजता श्री जरी मरी मंदिर, कोळीवाडा येथे एकत्र जमावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही यात्रा श्री जरी मरी मंदिर कोळीवाडा येथून सुरू होईल. पुढे श्री कोळेश्वर मंदिर नंतर वाणी आळी यानंतर मिरची गल्लीतून कापड गल्लीकडे जाईल. त्यानंतर जय भारत नाका येथून टिळक रोड परिसरात येईल. नंतर परदेशी आळीहून श्री वाल्मिकी मंदिर परिसरात येईल येथे या यात्रेची समाप्ती होईल.

# रयत विभागीय वक्तृत्व स्पर्धेत रिटघर विद्यालयाची आदिती भोपी प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तु.ह.वाजेकर फुंडे उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत, रयत शिक्षण संस्था सातारा, रायगड विभाग, कामोठे विभागीय वक्तृत्व स्पर्धा बुधवारी (दि. २७) झाली. या स्पर्धेत गट क्रमांक २ (मराठी)मध्ये 'आभाळाएवढे मन सौ. लक्ष्मीबाई पाटील' या विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत आदिती सुभाष भोपी हिने प्रथम क्रमांक पटकावला. त्या निमित्ताने रायगड विभाग कामोठे तर्फे प्रमाणपत्र आणि रोख रक्कम बक्षिस स्वरुपात देण्यात आले.

आदिती सुभाष भोपी ही श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, रिटघर येथील विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीस मार्गदर्शन करणाऱ्या वक्तृत्व विभाग प्रमुख शिक्षिका ए.पी. डाऊर व शिक्षक व्ही. एस. जोशी यांचे व आदिती भोपी हिचे विद्यालयाचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मुख्याध्यापक बी.बी. साळुंखे व सर्व स्कूल कमिटी सदस्य यांनी पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# महात्मा गांधी उद्यानात स्वच्छता मोहीम



**पनवेल : वार्ताहर**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानामध्ये महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिक सदस्याकडून स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. समाजातील सर्व घटकांना स्वच्छतेचे महत्व कळावे या दृष्टीने शहरातील उद्याने, पर्यटन स्थळे, स्मृतीस्थळे यांठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात येत असते. वर्षाचा शेवट हा चांगल्या कामाने करावा, समाजबांधीलकी या नात्याने समाजोपयोगी काम करून करावा या उद्देशाने पनवेलमधील राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानामध्ये महापालिकेचा स्वच्छता विभागाचे कर्मचारी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिक सदस्याकडून स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान करण्यात आले.

नव्या वर्षाचे स्वागत करताना आणि २०२३ वर्षाला निरोप देताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महर्षी वाल्मिकी शाखेच्या ज्येष्ठ नागरिकांच्या गटाने पनवेलच्या मध्यभागी असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी उद्यानात अतिशय उत्साहात स्वच्छता मोहिमेंतर्गत श्रमदान केले. या वेळी त्याचा उत्साह वाखण्ण्यासारखा होता. शहरातील लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांवरती सकारात्मक प्रभाव पाडण्याच्या दृष्टीने या ज्येष्ठ नागरिक सदस्यांनी केलेले श्रमदान खरोखरच प्रेरणादायी आहे.




**पनवेल : भाजप कार्यकर्ते अजय पाटील आणि सतिश ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सी. सी. भोईर, सी. एल. ठाकूर, किसन पाटील, अरुणशेठ ठाकूर, सागर ठाकूर, स्वप्नील ठाकूर यांच्यासह न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.**

# चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



उरण तालुक्यातील चिरनेर येथे शनिवारी (दि. ३०) संकष्टी चतुर्थीनिमित्ताने भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी थंडीची तमा न बाळगता पहाटेपासूनच, रांगा लावल्या होत्या. काही भाविकांनी पायी वारी करीत मंदिर गाठून, श्रींचे दर्शन घेतले. या वेळी मंदिरात भजनांचा सूर ऐकायला मिळाला.

रायगड, नवी मुंबईसह हजारोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते. विशेषता छोट्या–मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय तेजीत होता. परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल, नारळ, हार, फुले व पापड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते.

श्री महागणपती मंदिर परिसरात फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. त्यामुळे श्री महागणपती मंदिर परिसरात मोठी वर्दळ दिसून आली. विशेषता मंदिरात येणारे भाविक येथून आवर्जून हा रानमेवा खरेदी करताना दिसत होते. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थान तर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# न्हावे विद्यालयात स्नेहसंमेलन, पारितोषिक वितरण समारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल या विद्यालयाचे सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षातील पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन उत्साहात झाले.

यावेळी विद्यालयाच्या वतीने वैयक्तिक क्रीडा व सांघिक खेळांमधील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देवून गौरविण्यात आले. तसेच ओ.एन.जी.सी.च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांनाही भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यानंतर झालेल्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी लक्ष्यवेधी नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी यांनी केले.

या वेळी स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर, माजी सरपंच व ज्येष्ठ सदस्य हरिश्चंद्र म्हात्रे,उपसरपंच राजेश म्हात्रे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी न्हावे ग्रामपंचायतचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य किसन पाटील, ज्येष्ठ सदस्य व माजी सरपंच हरिश्चंद्र पाटील, सदस्य सल्लागार रामचंद्र पाटील व सी.एल.ठाकूर, हनुमान भोईर, मिनाक्षीताई पाटील, देशमुख गुरुजी, देवेंद्र म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य प्रमोद कोळी, सागरकुमार रंधवे (सूत्रसंचालक) तसेच विद्यालयाचे सेवक प्रसन्न ठाकूर, कुसुम ठोंबरे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# बाजारात डाळिंबांची आवक वाढली

**पनवेल, नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळ बाजारात डाळिंबाची आवक वाढली असून भगवा या जातीच्या डाळिंबांना प्रचंड मागणी आहे. लाल चुटुक आणि साखरेप्रमाणे गोड असणाऱ्या या डाळिंबांनी फळ बाजार सजले आहेत.

हिवाळ्यात आता डाळिंब भाव खाऊन जात आहे. हाडे मजबूत करण्यासाठी डांळिंब खाण्याचा सल्ला आजीच्या बटव्यात हमखास आढळतो. नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या राजस्थान येथून डाळिंबाची आवक वाढली असून ठोक बाजारात ५० ते १०० रुपये प्रतिकिलो ही डाळिंब मिळत आहेत.



दुसरीकडे याच भगवा जातीचे मात्र महाराष्ट्रातील बीड, संभाजी नगर सोलापूर धाराशिव जिल्ह्यातून डाळिंब दाखल होत आहेत. मात्र महाराष्ट्रातील डाळिंबांना प्रति किलो ७० ते १५०रुपये दर मिळत आहे. राज्यातील डाळिंबाचे बी आकाराला छोटे व रस जास्त तर राजस्थान डाळिंबात बी काहीसे जाड व महाराष्ट्र डाळिंबाच्या मानाने रस कमी असतो. त्यामुळे राज्यातील डाळिंबांना तुलनेने चांगला भाव मिळत आहे अशी माहिती डाळिंबाचे व्यापारी हर्षल जेजुरीकर यांनी दिली.


# राजेश खन्नाची फिल्मी मुहूर्तातील हौस मौज

हा रस्ता 'मजनून'च्या मुहूर्ताकडे जातो... वांद्रे रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडे उतरताच समोर असं भलं मोठं होर्डींग्स लक्ष वेधून घेते आणि मेहबूब स्टुडिओत जाईपर्यंत अधेमधे हेच सांगणारी होर्डींग्स/बॅनर्स/पोस्टर.

हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत 'मुहूर्ताची पोस्टर रस्तोरस्ती लागण्याचा' हा दुसरा अनुभव. निर्माते सुभाष देसाई यांनी मनमोहन देसाई दिग्दर्शित 'सुहाग' (१९७८)च्या मुहूर्ताची आमच्या गिरगावातील विजेच्या खांबावरही पोस्टर लावल्याची आम्ही मित्रांनी भवन्स कॉलेजमधील कॅन्टीनमध्ये केवढी चर्चा केली. मग लक्षात आले, हे देसाईबंधू गिरगावातील खेतवाडीत राहतात म्हणून ही पोस्टरबाजी.

'मजनून'ची पोस्टरबाजी म्हणजे राजेश खन्नाला आपला जन्म दिवस (२९ डिसेंबर) जनसामान्यांना दाखवून देण्याची हौस मौज आहे लक्षात येत होते. १९७९ची ही गोष्ट.

राजेश खन्नाच तो, 'साध्या साध्या गोष्टीत त्याचं मन लागेलच कसे? 'मजनून'चा निर्माता तोच होता. कमाल अमरोही दिग्दर्शक आणि राखी गुलजार नायिका. स्क्रीन साप्ताहिक, ट्रेड पेपर्समध्ये पानभर जाहिरातीत आकर्षक पोस्टर डिझाईन.




मेहबूब स्टुडिओतील फ्लोअर दोनवर मुहूर्तासाठी भला मोठा सेट लागलेला. डिंपल कापडिया फिल्मी पाहुण्यांचे छान हसत हसत स्वागत करतेय. राजेश खन्नाचा वाढदिवस आणि 'मजनून'चा मुहूर्त असा दुहेरी सुखद योग असल्यानेच की काय, अनेक पाहुणे भला मोठा पुष्पगुच्छ घेऊन येत होते. जी.पी. सिप्पी, शक्ती सामंता, राज खोसला, जे.ओम प्रकाश, मोहनकुमार, शोमु मुखर्जी, रुपेशकुमार असे त्या काळातील राजेश खन्ना कॅम्पमधील सगळेच फिल्मवाले एकेक करत आले. माहौल एकदम बदलून गेला. मुहूर्ताच्या आमंत्रणावरील अकरा वाजताची वेळ केव्हाच निघून गेली होती. सेटवर पूजा सुरू होती.

कमाल अमरोही सायलेन्स असे ओरडले तरी वातावरण शांत होण्यास वेळ गेला. पिक्चरचा मुहूर्त बडी ही शान से अशा आपल्या स्वभावानुसार हे घडत होते. अखेर मुहूर्त दृश्य सुरू झाले, ऐतिहासिक पोषाखातील राजेश खन्ना व राखी हे भल्या मोठ्या जळत्या मेणबत्तीच्या सहाय्याने प्रेमाच्या आणाभाका घेतात. संवादावर उर्दूचा विलक्षण प्रभाव जाणवतो.

दृश्य चित्रीत होतेय तोच प्रचंड टाळ्या. मिठाई आणि सॉफ्ट ड्रिंक्सचे भरपूर वाटप. त्या काळात मीडिया म्हणजे फक्त पेनवाले व फोटोग्राफर. अर्थात मुद्रित माध्यमे आणि घाई अशी कोणालाच नाही.

राजेश खन्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी 'मजनून' या महाखर्चिक चित्रपटाचा भव्य दिमाखदार मुहूर्त असे जोरदार मीडिया कव्हरेज येत राहिले. बरेच दिवस चित्रपटसृष्टी, फिल्म दीवाने आणि मीडियात याच मुहूर्ताची रंगवून खुलवून चर्चा आणि हळूहळू लक्षात येत गेले, या भव्य मुहूर्तावरच 'मजनून'ची प्रगती थांबली ती कायमचीच.


चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील 'बंद' पडलेल्या चित्रपटांच्या 'फ्लॅशबॅक'मध्ये 'मजनून'ची आठवण हुकमी. गंमतीत म्हटलं गेले, 'मजनून'चा कलरफुल मुहूर्त आणि त्याच रात्री जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलमधील ग्लॅमरस पार्टी यांच्या अफाट अचाट खर्चात त्या काळातील एक सामाजिक मराठी चित्रपट निर्माण झाला असता.


राजेश खन्नाच्या जन्मदिनानिमित्त त्याच्या अशाच काही चित्रपट निर्मितीच्या विविध टप्प्यांवर बंद पडलेल्या पिक्चर्सवर हा फोकस. यातही एक स्टाईल आहे, करिश्मा आहे, कारण हे राजेश खन्नाचे पडद्यावर न आलेले चित्रपट आहेत.

असाच आणखी एक, आजच्या मल्टीप्लेक्स ओटीटी पिढीला संजय लीला भन्साली दिग्दर्शित 'बाजीराव मस्तानी 'माहित्येय, पण दिग्दर्शक मनमोहन देसाईंचाही 'बाजीराव मस्तानी' (१९७८) हा अतिशय भव्य चित्रपट होता. त्यात राजेश खन्ना रोमॅन्टीक हीरो. अर्थात बाजीराव व हेमा मालिनी मस्तानी. परफेक्ट कास्टिंग.

राजेश खन्नाला शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना' (१९६९) ने स्टार केले तरी मनमोहन देसाई दिग्दर्शित 'सच्चा झूठा'(१९७१) ने सुपर स्टार केले. मनजी आणि राजेश खन्ना 'रोटी'(१९७४)मध्ये पुन्हा एकत्र आले. या चित्रपटाच्या निर्मीतीच्या काळात मनजी आणि राजेश खन्नात प्रचंड मतभेद झाल्याची गॉसिप्स मॅगझिनमधे भरपूर चर्चा रंगली. इतकी की ते पुन्हा एकत्र काम खरंच करतील काय याचीच शंका, पण सिनेमाच्या जगातले सगळेच वाद 'अंतिम फेरी' नसतात. काही अपवाद हो. हिट आणि फ्लॉपने सगळी गणितेच काय अगदी नातीदेखील बदलतात. इगो बाजूला ठेवून पुन्हा कामाला लागतात. तेथेही उत्तम अभिनय कामाला येतो.

बरं, 'बाजीराव मस्तानी'ची प्रेमकथा म्हणजे ऐतिहासिक पाश्वभूमीवरील उत्कट प्रेम, भव्यदिव्यता आणि यासाठी सत्तर एमएमचाच पडदा हवा. ट्रेड पेपर्समध्ये दोन पाने जाहिरात दिल्याने कुतूहल निर्माण केलेला 'बाजीराव मस्तानी' त्याच जाहिरातीपुरता रहावा? अरेरे. प्रेम व्यक्त करण्याची राजेश खन्नाची आपली एक स्टाईल होती आणि अशाच रूपेरी पडद्यावरील प्रेमाचा स्वीकार करण्याची हेमा मालिनीची आपली एक अदा होती.



दोन वा तीन भाऊ लहानपणी जत्रेत हरवले गवसले अशाच हुकमी मनोरंजक फॉर्मुलाबाज चित्रपटाचे दिग्दर्शक मनमोहन देसाई यांची रोमॅन्टीक कथा पडद्यावर कशी खुलली हे पाहणे रंजक ठरले असते ना? या चित्रपटात हेमाजी नव्हे राखी गुलजार मस्तानी साकारणार अशीही बातमी होती बरं का?... ते ठीक आहे हो पण काशीबाई कोण असती? रेखा? एकदम जोर का झटकाच. हेही परफेक्ट कास्टिंग हो. पण होता होता राहिले.

आता तुम्हीच सांगा राजेश खन्ना आणि जेम्स बॉण्ड हे समीकरण शक्य होते काय? शोभले असते काय? राजेश खन्नासाठी अनेक युवती पागल झाल्या होत्या. एकदा तर त्याच्या गाडीचं इतक्या जणींनी चुंबन घेतले की गाडीचा रंगच बदलला. काही फॅन युवती त्याला आपल्या रक्ताने पत्र लिहून आपलं प्रेम व्यक्त करीत. युवतींची अशी सपोर्ट सिस्टीम असली म्हणून काय तो जेम्स बॉण्ड?

हिंदी चित्रपटात 'देशी जेम्स बॉण्ड' पाह्यला मिळालाच नाही असे अजिबात नाही. भले इंग्रजी चित्रपटासारखा तो पॉवरफुल अॅक्शनबाज नसेल, त्याच्या अवतीभवती पाश्चात्य व्यक्तिमत्वाच्या मोहक, मादक ललना नसतील, त्याच्याकडे आधुनिक पिस्तूल वा घोडा (त्या काळातील हो!) नसेल, कार चेसिंगमध्ये तो स्मार्ट नसेल, पण तो हिंदी चित्रपटाच्या प्रेक्षकांना अपेक्षित 'फॉरेन टच' (वा फॉरेन रिटर्न) बॉण्ड मसाला सिनेमा असू शकतो. 'फर्ज ' (जितेंद्र), 'एजन्ट विनोद ' (महेन्द्र संधु), 'किमत' (धर्मेंद्र), 'सुरक्षा' (मिथुन चक्रवर्ती), 'इंटरनॅशनल क्रूक' (धर्मेंद्र) असे देशी बॉण्डपट चक्क यशस्वी झाले. त्या काळात फाडफाड इंग्रजी चित्रपट पाहू नि समजू न शकणारा पब्लिक अशा हिंदी पिस्तूलबाज देमाल चित्रपटांवर फिदा असे. जोडीला नाचगाण्याची मेजवानी असेच. हिंदी पिक्चर है भाई. हिंदी चित्रपटातील बॉण्ड थोडाच विदेशी असणार? आणि त्या काळात कॉम्प्युटर ग्राफिक्स वगैरे तंत्रज्ञान नव्हतेच. पडद्यावर खरी खुरी वाटावी अशी खोटी खोटी फायटिंग असे.


राजेश खन्नाची इमेज, पर्सनालिटी आणि देहबोली अॅक्शन हीरोची नसूनही बॉण्ड साकारू शकतो का? कुछ भी हो सकता है ते जाऊ देत. सत्तरच्या दशकाच्या उत्तरार्धात त्याचा अतिशय 'पडता काळ' असताना तो 'कमबॅक'साठी अशा काही उचापती करायचा. या चित्रपटाच्या नावातच 'राजेश खन्ना ००७'. स्क्रीन साप्ताहिकात पानभर जाहिरात.


या चित्रपटाच्या मुहूर्त दृश्यात तो गाडीतून येत हवेत पिस्तूल चालवतो आणि नायिका पद्मिनी कपिला त्याला छान बिलगते असे दृश्य चित्रीत झाले. (खरंतर ही जोडीच विचित्र होती. पिक्चरचं स्वरूप पाहता झीनत अमान वा परवीन बाबी योग्य होती.)

या चित्रपटाचे दिग्दर्शक नरेन्द्र बेदी आणि राजेश खन्ना अतिशय चांगले मित्र म्हणून ओळखले जात. त्यांच्या 'बंधन', 'द ट्रेन', 'महाचोर' अशा काही चित्रपटात राजेश खन्ना हीरो होता. '००७'मध्ये असरानी, प्रेम चोप्रा वगैरे होतेच. चित्रपटाचे संवाद कादर खानचे होते.

मुहूर्त जोरदार झाल्याचे मीडियात भरभरून कव्हरेजही आले. त्या काळात 'शूटिंग रिपोर्टींग'ची सदरे वाचनीय होत. हाही चित्रपट बंद पडला आणि त्याचा जोरदार मुहूर्तच तेवढा आठवणीत राहिला हे समजलेच नाही... राजेश खन्नाही तेव्हा ते विसरला असेल.

असेच एकदा १९८८ साली एक फिल्मी मुहूर्ताचे आमंत्रण हाती आले. राजेश खन्ना निर्मित 'जय शिव शंकर' या चित्रपटाचा गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीत मुहूर्त.



चित्रपटाचे दिग्दर्शन एस. व्ही. चंद्रशेखर राव यांचे (ते दक्षिणेकडून आलेले). विशेष म्हणजे या चित्रपटात चक्क राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया हे नायक नायिका. असा योग जुळून आल्याचा हा एकमेव चित्रपट. म्हणून तर मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकारांना मुहूर्ताला आवर्जून आमंत्रित केले. चित्रनगरीतील देवळात हा मुहूर्त होता. सेटवरचे प्रफुल्लित वातावरणच सांगत होते, हा राजेश खन्नाचा पिक्चर आहे. असा व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडायला हवाच हो. असं असूनही नारिंगी साडीतील डिंपल अगोदर आली आणि मग राजेश खन्ना आला (त्याचीही चक्क बातमी झाली. तेव्हापासून अशा बातम्या होताहेत.) मुहूर्ताला दिग्दर्शक बी. आर. चोप्रा, विजय आनंद, जे.ओम प्रकाश, मोहनकुमार असे अनेक जण शुभेच्छा द्यायला हजर. हा अगदी मल्टी स्टार कास्ट चित्रपट . जितेंद्र, पूनम थिल्लॉन, चंकी पांडे आणि संगीता बिजलानी असे तेव्हाचे टॉपचे स्टारही या चित्रपटात. रमेश देव आणि सीमा यांच्याही या चित्रपटात भूमिका. राजेश खन्नाचे गीतकार मित्र आनंद बक्षी आणि संगीतकार मित्र राहुल देव बर्मनचे संगीत. असे सगळे व्यवस्थित होते. उटी येथे एक मोठे शूटिंग शेड्युलही झाले. मुंबईतील मीडियाला शूटिंग कव्हरेजसाठी नेलेही. राजेश खन्ना आणि डिंपल कपाडिया खरं तर त्या काळात वेगळे राहत होते, त्यांच्या संसारातील भांडणे गॉसिप्स मॅगझिनमधून रंगवून खुलवून चघळली जात होती. त्यामुळेच तर या चित्रपटात ते एकत्र आले आहेत याला बरेच महत्त्व. या चित्रपटातील या दोघांच्या रोमॅन्टीक पोझच्या फोटोना तेव्हा भरपूर कव्हरेज मिळाले. दोघांच्याही चाहत्यांना या चित्रपटाबाबत प्रचंड उत्सुकता लागली होती आणि राजेश खन्नाच्याच 'आप की कसम'मधील हिट गाण्याचा मुखडा या चित्रपटाचे नाव असल्याने तर आणखीच अपेक्षा, पण हे सगळे मिडियात आणि चाहत्यांमध्येच राहिले. हा चित्रपट पडद्यावर आलाच नाही. त्यामुळेच 'जय शिव शंकर' असे म्हणताक्षणीच अनेकांना 'आप की कसम 'चे गाणे हमखास आठवते, पण त्या नावाचा चक्क राजेश खन्नाची भूमिका असलेला चित्रपट होता हे आठवत नाही. एखाद्या रिलीज न झालेल्या चित्रपटाची अशीही गोष्ट.



**झूम प्रहर**

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

राजेश खन्नाच्या पडद्यावर न आलेल्या चित्रपटांचे प्रगती पुस्तकही बरेच मोठे. काही नावे सांगायला हवीतच. बी.आर. चोप्रा दिग्दर्शित 'सोहनी महिवाल' (नायिका नीतू सिंग), प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जादुगर' (यात राजेश खन्नासोबत शत्रुघ्न सिन्हा, झीनत अमान, सारिका आणि प्राण) याची ट्रेड पेपरमध्ये भली मोठी जाहिरात आली. पुढे प्रगती इतकीच की, प्रकाश मेहरा स्टार कास्ट बदलून 'जादुगर' पडद्यावर आणला आणि त्या काळातील अमिताभचा तो अपयशी चित्रपट ठरला. प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'कायर' (जोडीला हेमा मालिनी व संजय खान), दिग्दर्शक प्रकाश मेहरा व राजेश खन्ना कधीच एकत्र आले नाहीत हेही विशेषच. रमेश दिग्दर्शित 'नाका', 'मोहनकुमार दिग्दर्शित 'अपराधी' (नायिका शबाना आझमी), मनोजकुमार अभिनित व दिग्दर्शित 'नया भारत' (या चित्रपटाची पटकथा व संवाद सलिम जावेदचे होते), सुरेश ग्रोव्हर दिग्दर्शित 'आप के काबिल', शम्मी कपूर दिग्दर्शित 'प्यास', के. हुसेन दिग्दर्शित '६ डिसेंबर लव्ह स्टोरी' (जोडीला जॅकी श्रॉफ, नेहा धुपिया), बी.आर. चोप्रा दिग्दर्शित 'पुरुष' (नायिका शबाना आझमी), विमल चड्डा दिग्दर्शित 'साहिब', बी.आर. चोप्रा दिग्दर्शित 'पुरुष' (नायिका शबाना आझमी), रामानंद सागर दिग्दर्शित 'अंगारा' (नायिका शबाना), चेतन आनंद दिग्दर्शित 'संध्या काल' (नायिका राखी), सुरेन्द मोहन दिग्दर्शित 'वापसी' (नायिका राखी व झीनत), वगैरे आणखीन काही. यात एक चित्रपट मला विशेष वाटतोय, 'सीमा'. १९६८ साली म्हणजे राजेश खन्नाच्या कारकिर्दीचा सुरुवातीचा काळ. चित्रपटात मीनाकुमारी व शशी कपूर. या चित्रपटातील फोटो त्या काळात प्रसिद्ध होत राहिले, पण चित्रपट आलाच नाही.

राजेश खन्नाच्या जन्मदिनानिमित्त अशी त्याच्या पडद्यावर न आलेल्या चित्रपटांचा विशेष फ्लॅशबॅक.

# भारतातील सुफीवादाची जपलेली परंपरा

प्राचीन काळापासून भारतातील सुफीवादाची शिकवण त्या काळातील दुर्वेश फकीर आणि सुफींनी लोकांपर्यंत पोहचवली. त्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे विविध धर्मांचे लोक सुफीवादाकडे आकर्षित झाले. सुफींनी आपल्या संमेलनात ज्या प्रकारे अल्लाह (ईश्वर) एक आहे असे सांगितले आणि त्याची उपासना (पूजा) शिकवली, अल्लाहचे स्मरण करीत राहिले आणि मेहफिल-ए-समा (कव्वाली मेळावा)द्वारे लोकांपर्यंत खूप जोमाने पोहचले. सुफींच्या मते, पीर (गुरू)शिवाय ईश्वरापर्यंत पोहचू शकत नाही. अल्लाह, पैगंबर साहिब आणि गौस ख्वाजा यांचे स्मरण त्यांच्या मेळाव्यात केले जाते, तर त्यांच्या मेळाव्यात राम आणि कृष्णाची गाणीही गायली जातात, म्हणूनच सुफींच्या खानखान्यांमध्ये (आश्रमांमध्ये) खानसाहेब आढळतात तसे पंडितही दिसतात. सुफीवाद हा प्रेम आणि आपुलकीने भरलेला संदेश आहे जिथे फक्त माणुसकी आहे, बाकी काही नाही. इथे धर्माची भिंत तुटते आणि सर्व धर्माचे लोक भावासारखे राहतात.

सूफी हा मानवतेच्या कल्याणाची शिकवण देणारा पंथ असून त्या दिशेने वाट दाखविणारा एक दिवा आहे. धर्म विचारात न घेता मानवता हाच धर्म मानून परस्पर प्रेमभावना वाढीस लावणारा हा संप्रदाय आहे. गुरू-शिष्य परंपरेला विशेष महत्त्व असलेल्या सूफी विचारप्रणालीची बिजे कुराणात आणि मोहम्मद पैगंबरांच्या बोधवचनात आढळून येतात. सुफींचे मुख्य ध्येय सत्य, परमात्म्यात विलीन होणे हे असते. त्यामुळे सूफी संत नित्य स्मरण, समाधी, ध्यानधारणेत किंवा ईश्वरी चिंतनात म्हणजे इबादत करण्यात आपला वेळ व्यतीत करतो. सुफींना परमात्म्यात विलीन व्हावेसे वाटते ज्याला 'फना' म्हणतात. सूफी मत म्हणजे दिव्यत्वाकडे प्रवास कसा करावा, आपले अंतरंग वाईट गोष्टी सोडून शुद्ध कसे करावे आणि प्रशंसनीय गुणांनी त्याला कसे सजवावे हे सांगणारे शास्त्र होय.

सुफींच्या संप्रदायांपकी चिस्ती संप्रदायाचा प्रसार संपूर्ण देशभरात अधिक झाला. सुफींनी ११व्या शतकात दक्षिण भारतातील अनेक ठिकाणी खानखाह स्थापन केल्यानंतर दौलताबाद, गुलबर्गा, बिजापूर, गोवळकोंडा, पेनुकोंडा, त्रिचनापल्ली येथे सुफींची केंद्रे प्रस्थापित झाली. सुफीमधील उपपंथ वेगवेगळ्या संतांच्या अनुयायांनी स्वतंत्रपणे चालविले. सूफी संतांनी सामान्य मुसलमान जनतेत अफाट लोकप्रियता मिळाली. संतांच्या समाध्या (दर्गे) ही तीर्थक्षेत्रे बनत चालली.

आजदेखील भारतात अनेक खानकाहमधून मानवतेची शिकवण दिली जाते. त्यापैकीच एक म्हणजे मुंबईतील ऑण्टॉप हिल स्थित मेहफिल-ए-जहांगिरिया. सूफी फैझुल हसन शाह मजिदी उर्फ सूफी बाबा यांच्या विचार आणि शिकवणीतून त्यांचे अनेक अनुयायी देशभर पसरले आहे. यात केवळ मुसलमानच नव्हे; तर इतर धर्मीयदेखील भक्तीभावाने



इथे येतात. सूफीबाबा उर्फ सूफी फैजूल हसन शाह मजिदी यांचे वडील ख्वाजा सूफी मजिदूल हसन शाह यांचे जगभर शिष्य आणि अनुयायी होते. त्यांनीदेखील दिलेल्या मानवतेच्या शिकवणुकीमुळे आज हा वारसा त्यांचे पुत्र सूफीबाबा चालवतात.

हजरत ख्वाजा सूफी मजिदूल हसन शाह यांना प्रेषित महंमद पैगंबर यांच्यापासूनच्या सूफी परंपरेत ४५वे धर्मगुरूचे स्थान आहे. त्यांचे वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे त्यांचा सांभाळ आईने केला. बालवयात खीर, हलवा विकणे, खेळणी बनवणे असे छोटे उद्योग करून त्यांनी उदरनिर्वाह करायला प्रारंभ केला. हे करीत असताना त्यांचा लोकसेवेकडे कल वाढू लागला. समोरच्या व्यक्तीला त्यांच्या गरजेनुसार मदत ते करीत. संपूर्ण मानव जातीची होत असलेल्या दुरवस्था व त्यांचे दुःख यापासून त्यांना दिलासा देण्यासाठी तसेच एक फुंकर मारण्यासाठी काय करता येईल याच विचारात ते असायचे. ते खऱ्या अर्थाने स्थिरावले ते ऑण्टॉप हिलच्या त्या वेळेच्या एका टेकडीवर. त्यांच्या पश्चात सूफी बाबा उर्फ सूफी फैजुल हसन शाह मजिदी यांचाही स्वभाव आणि सर्वांबाबतची आपलेपणाची भावना पाहून भोवतालची मंडळी त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागली. बाबा कुठलेही अवडंबर न माजवता त्यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करतात. मुंबई, महाराष्ट्रासह भारतातील सर्व प्रांतातील मंडळी येऊ लागली आहेत. त्यात वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचाही समावेश आहे. इथे येणाऱ्या प्रत्येकाला बाबा हे एक मानसिक आधार वाटू लागले.

मेहफिल-ए-जहांगिरिया हा भारतातील सूफीवासीयांसाठी एक प्रमुख केंद्र बनले असले तरी त्याची केवळ हीच ओळख नाही, तर इथे इतर मंडळीही श्रद्धेने येत असल्यामुळे सर्वधर्मीयांचा आश्रम म्हणजे मानवतेचे केंद्र ठरले आहे. त्याच्या पायऱ्यांवर तसे लिहलेले आढळते. राष्ट्रीय एकता, मानवतेचा सौहार्दपूर्ण वर्तन, आपला जन्म हा सार्थकी लागावा यासाठी चांगले काम करणे, सर्व धर्मीयांशी आपुलकीने आणि स्नेहाने वागा अशा आशयाचे संदेश फलक लिहिलेले आहेत. प्रतिकूल अशा सामाजिक परिस्थितीतदेखील त्यांनी समाजासाठी दिलेले योगदान महत्त्वाचे राहिलेले आहे. त्यांच्या कार्याला वेगवेगळी रूपे होती. ईश्वराशी संपर्क साधण्याचे माध्यम म्हणजे सूफी बाबा आहेत. ते आपल्या शिष्यांची पुरेपूर काळजी घेतात. श्रीमंतांना गरीबांचा उद्धार किंवा पुनर्वसन करण्यासाठी आग्रह धरतात, तर काहींना आपल्या पदरचे देऊन स्वावलंबी होण्यास मदत करतात. आपल्या आरोग्याशी हेळसांड करणाऱ्यांना धाक दाखवतात. इथे येणाऱ्यांनी निराश होऊन जाऊ नये, असा त्यांचा प्रयत्न असतो. प्रत्येकाची इच्छा आकांक्षा त्यामुळे इथे पूर्ण होताना दिसून येते. अनेकांना आत्महत्या करण्यापासून बाबांनी परावृत्त केले आहे. मानसिक आधार दिला आहे. ईश्वर हा प्रत्येकाच्या हृदयात असतो, खुद को पहचानो, खुदा मिल जायेगा, असे त्यांचे विचार आहेत. हाच संदेश आणि प्रेरणा इथून प्रत्येकाला मिळत असते.

मेहफिल-ए-जहांगिरिया या ठिकाणी होळी, कव्वाली आणि बसंत हे एकत्र साजरे होतात. फारशी, उर्दू आणि संस्कृत कव्वाली गायलेली ऐकायला मिळते. बाहेरच्या दुनियेत मोठ्या हुद्द्यावर असलेली अनेक शिष्य मंडळी इथे आल्यानंतर एकत्रित श्रमदान आणि स्वयंसेवक म्हणून काम करताना दिसतात. कुठलाही भेदभाव दिसून येत नाही. असंभव गोष्टी संभव होतात ते याच ठिकाणी. त्यामुळेच अण्टॉप हिलचे हे मेहफिल-ए-जहांगिरिया मानवतेच्या कल्याणाचे केंद्र बनले आहे. संत कबीर यांचे दोहे या ठिकाणी चपखल बसतात ते असे की,

*गुरू गोविंद दऊ खडे, काके लागू पांय,*
*बलिहारी गुरु अपने गोविंद दियो बताय।*
*गुरू बिन ज्ञान न*
*उपजै गुरु बिन मिले न मोष,*
*गुरु बिन लखै न सत्य को*
*गुरु बिन मिटै न दोष।*

गुरु आणि ईश्वर समोर असताना गुरूला सन्मान करा, कारण त्यांच्यामुळे ईश्वरापर्यंत पोहचता येते, त्याची अनुभूती घेता येते. असाच संदेश सूफी बाबांचे दर्शन घेतल्यानंतर प्रत्येकाला येतो. मुंबईतील अँटॉप हिल येथील दर्गा ख्वाजा सूफी माजिदुल हसन शाह र.ह. हे सूफी धर्माचे मोठे केंद्र आहे. येथे सुफीवादाचा प्रचार केला जातो, ही प्रक्रिया ख्वाजा गरीब नवाज, निजामुद्दीन औलिया यांच्या माध्यमातून या दर्ग्यापर्यंत पोहोचली आहे.

**-अदनान कुरेशी**

# अलिबाग मतदारसंघात महायुती सरकारमुळे निधी -आमदार दळवी

## मुरूड पर्यटन महोत्सवाचे उद्घाटन

**मुरुड : प्रतिनिधी**

महायुती सरकारमुळे अलिबाग मतदार संघातील अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यासाठी सर्वाधिक मोठा निधी प्राप्त झाल्याने आज जिथे तिथे विकासकामे सुरू आहेत. सर्व सामान्य जनतेचे प्रश्न त्याच बरोबर रखडलेला विकास मार्गी लागण्यासाठी नवीन सरकार स्थापन झाल्यापासून मोठा निधी प्राप्त झाल्याने माझ्या मतदार संघात मी विकास करू शकलो असे महत्वपूर्ण प्रतिपादन स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे. मुरूड येथील पर्यटन महोत्सवाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.



मुरूड येथे पर्यटन महोत्सवाचे उद्घाटन भव्य दिव्य स्वरूपात करण्यात आले. या वेळी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलन करण्यात येऊन आकाशात फुगे सोडून उद्धघाटन भव्य स्वरूपात करण्यात आले. या वेळी मुरूड शहरातून भव्य शोभा यात्रा काढून यामध्ये रेणुका देवी, केरळमधील कांतारा देवाची प्रतिकृती तयार करण्यात आली होती. या वेळी या शोभा यात्रेत लेझीम पथक, बेंजो पथक, संचलन पथक समस्त जनसमुदाय सहभागी झाला होता.

या वेळी आमदार दळवी यांनी सांगितले कि, निवडणुकीपूर्वी मुरूड शहराचा कायापालट करणार असे अभिवचन दिले होते. त्याप्रमाणे मुरूड शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देऊन प्रत्येक बाबीत सुधारणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्व आमदारांपैकी सर्वाधिक निधी लोक सेवेसाठी खर्च करण्याच्या यादीत टॉप पाचमधील मी एक आमदार आहे याचा येथील जनतेला निश्चित आभिमान असणार आहे. साळाव–मुरूड रस्ता हा हॅम्प योजनेतून घेतला असून मार्च महिन्यात या कामाचे टेंडर निघणार आहे.

नव्याने होणार हा रस्ता मजबूत, रुंदीने जास्त हा रस्ता चिरकाल टिकणारा असणारा असेल अशी शास्वती या वेळी आमदार दळवी यांनी दिली आहे. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी आमदार झालो आहे. लोकांवर कोण अन्याय करीत असेल तर ते मी कदापि सहन करणार नाही. आतापर्यंत संपूर्ण मुरुड तालुक्यासाठी २५० कोटींचा निधी आणला असून सर्वत्र भागात विकासाची कामे सुरू आहेत. मुरूड शहरासाठी उर्वरीत विकास कामे करण्यासाठी मोठा निधी प्राप्त करून देणार असल्याचे प्रतिपादन आमदार दळवी यांनी केले आहे.

या वेळी रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई यांनी आपल्या भाषणात विशेष नमूद केले की, मुरूड तालुक्याला आतापर्यंत कोट्यवधी रुपयाचा निधी कोणत्याही लोकप्रतिनिधीने दिला नव्हता परंतु अलिबाग मुरूडचे कार्यक्षम आमदार महेंद्र दळवी यांनी हे सर्वांत मोठे काम करून मुरूड शहरास ग्रामीण भागाचा विकास करण्यात महत्त्वाचे योगदान दिल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

**विविध मागण्या व आभार**

या वेळी पर्यटन महोत्सवाच्या अध्यक्षा कल्पना पाटील यांनी विनंती केली की, साळाव–मुरूड रस्ता लवकरात लवकर पूर्ण होईल याकडे लक्ष देण्याची विनंती केली. पर्यटन महोत्सवाबद्दल विशेष आभार मानले. त्याचप्रमाणे पदमदुर्ग किल्ल्यावर जेट्टी उपलब्ध करून देणे, डोंगरी येथील सन सेट पॉईंट विकासासाठी निधी व समुद्रकिनारी कायम स्वरूपी स्टेज उपलब्ध करून देण्यासाठी विनंती केली.

उद्घाटन कार्यक्रमासाठी व्यासपीठावर पर्यटन महोत्सवाचे उपाध्यक्ष प्रकाश सरपाटील, वीरेंद्र भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, गिरीश साळी, सुपारी संघाचे चेरमन बाबा दांडेकर, जिल्हा अध्यक्ष राजा केणी, तहसीलदार रोहन शिंदे, मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, भाजप मुरूड शहर अध्यक्ष उमेश माळी, सिनेकलाकार दिगम्बर नाईक, मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील, गायक अभिजित कौसंबी, जिल्हा संघटिका शुभांगी करडे, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर आदी उपस्थित होते.

# खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन

## जयंत पाटलांच्या वेश्वीत महायुतीचा झंझावात

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील रहात असलेल्या वेश्वी गावात खासदार सुनील तटकरे यांनी आज दौरा केला. वेश्वीतील विविध विकास कामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन खासदार तटकरे यांच्या हस्ते झाले. या भागाचा विकास होवू नये, हा भाग आहे तसाच रहावा असे काही जणांना वाटते कारण ते राजकीय दृष्टया ते त्यांना सोयीचे आहे, असा टोला तटकरे यांनी या वेळी जयंत पाटील यांचे नाव न घेता लगावला.

रसायनी टेकडीवरील दत्तमंदिराच्या सभा मंडपाचे भूमीपूजन, वेश्वीतील दत्तमंदिर रस्त्याचे लोकार्पण, गोंधळपाडा ते चेंढरे रस्त्याचे भूमीपूजन, गोकुळेश्वर रस्त्याचे भूमीपूजन, गोंधळपाडा स्मशानभूमी रस्त्याचे भूमिपूजन तटकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार महेंद्र दळवी हेदेखील उपस्थित होते.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जसा देशाचा विकास होत आहे तसाच राज्याचा विकास महायुतीच्या माध्यमातून होत आहे. मुंबईला जवळ असलेला रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने नकाशावर आला आहे. इथल्या पर्यटनाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांची निर्मिती टप्प्या टप्प्याने केली जात आहे. रेवस ते रेडी या सागरी महामार्गाचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल. जिल्हयात महायुतीच्या माध्यमातून सागरमाला प्रकल्पांतर्गत १५०० कोटी रूपयांची जेटींची कामे मंजूर असून काही कामांना प्रत्यक्षात सुरूवात झाल्याचे तटकरे यांनी सांगितले.

रायगडचा विकास झपाटयाने होत आहे. मुंबई पुणे नाशिक असा सुवर्ण त्रिकोण ओळखला जातो यात आता रायगड जिल्हाही समाविष्ट झाला असून आता तो सुवर्ण चौकोन ओळखला जात आहे, असे तटकरे म्हणाले.

या दौऱ्यात सुनील तटकरे यांनी वेश्वी ग्रामपंचायतीला भेट दिली. या वेळी सरपंच गणेश गावडे यांनी गावासाठी आवश्यक विकासकामांची यादी सादर करीत त्याची पूर्तता करण्याची विनंती केली. चारूहास मगर, नंदकुमार कदम, सुनील गुरव, राष्ट्रवादी काँग्रेसचे अमित नाईक, किहीमचे सरपंच पिंटया गायकवाड, आशीष भट यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.



# थर्टीफर्स्ट निमित्ताने रोह्यात कडक पोलीस बंदोबस्त

**धाटाव : प्रतिनिधी**



नववर्ष स्वागताची पार्टी जरुर करा, पण पार्टीच्या नावाखाली दारु पिऊन कुठेही हुल्लडबाजी करणाजयांवर रोहा पोलिसांकडून कडक कारवाईचे आदेश विशेष पोलीस पथकांना रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील हॉटेल, फार्म हाऊस येथे कोणताही अनुचित प्रकार घडल्यास कडक कारवाई करू, असे पोलिसांनी सांगितले आहे.

रोह शहर व तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षा दृष्टीने चार ठिकाणी नाका बंदी केलेली आहे तर दोन विशेष अधिकारी, चार अधिकारी कर्मचारी यांचा पेट्रोलिंग तैनात करण्यात येणार आहे तसेच ४० कर्मचारी हे ठिकठिकाणी बंदोबस्तासाठी सज्ज ठेवण्यात आलेला आहे त्यामुळे कायद्याचे पालन करून नववर्षाचे स्वागत नागरिकांनी करावे, असे आवाहन रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी केले आहे तर नव वर्षाच्या शुभेच्छाही रोहा पोलीस ठाण्याच्या वतीनेदेखील दिल्या.

# कर्जतमध्ये सव्वा अकरा कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा झाला. म्हाडा वसाहत, आमराई या भागातील ११ कोटी ३४ लाख रुपयांची ही कामे आहेत.

कर्जत म्हाडा वसाहती मधील आरक्षित भूखंड क्रमांक आठ (इ) तीन मजली फळ व भाजी मार्केट व बहुउद्देशीय हील बांधकाम करणे (४ कोटी ९९ लाख रुपये) म्हाडा वसाहतीतील रस्ते व गटार तयार करणे (९० लाख रुपये) तसेच येथील उद्यान विकसित करणे (३५ लाख रुपये), आमराई येथील खुले नाट्यगृह आरक्षण क्रमांक




१९ येथे इनडोअर, आऊटडोअर खेळण्याकरिता आवश्यक ती अनुषंगीक कामे करणे (५ कोटी रुपये), लहान पुला नजीक ओपन जिम तयार करणे (१० लाख रुपये) या विकासकामांचा आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा झाला.

या वेळी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेवक राहुल डाळिंबकर, बळवंत घुमरे, प्राची डेरवणकर, संकेत भासे, अभिषेक सुर्वे, वैभव सुरवकर, सुरेखा प्रधान आदी उपस्थित होते.

म्हाडा वसाहतीतील सभागृहात आयोजित समारंभात म्हाडा कॉलनी मिडल क्लास सोसायटीचे अध्यक्ष रवींद्र माने यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी आमदार थोरवे यांनी कर्जत शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कर्जतचा विकास झपाट्याने झाला म्हणून पाणीपुरवठा योजना कमी पडत आहे. आपण नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी प्रयत्नशील असून सुमारे ५० कोटी रुपये खर्चाची ही योजना असेल, असे स्पष्ट केले.

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन हमीद खैराट यांनी केले. या वेळी वासुदेव इंगळे, जी. वाय. पाटील, अरुण मालुसरे, मुन्ना पटेल, दिलीप बोराडे, दिनेश रावळ, प्रसाद पुरोहित, दौलत ब्राह्मणे, प्रकाश नलावडे, अभिजित पटेल, नदीम कुरेशी, सूरज रावळ, गणेश जंगम आदी उपस्थित होते.

# तब्बल १.३८ कोटींची चोरीस गेलेली मालमत्ता मिळवली परत

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे सुरक्षा बल प्रवासी व त्यांचे सामान सुरक्षित राहावे यासाठी नेहमीच अथक प्रयत्न करत असते. आपत्कालीन प्रतिसाद देत प्रवाशांच्या सुरक्षेशी संबंधित तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी आणि प्रवाशांसंबंधित गुन्हे रोखण्यासाठी तसेच त्याचा छडा लावण्यासाठी शासकीय लोहमार्ग पोलिसांसोबत एकत्र काम करत, 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' सुरू करण्यात आले आहे. मध्य रेल्वे, रेल्वे सुरक्षा बलाच्या शाखेने गेल्या आठ महिन्यांत एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ मध्ये रू. १.३८ कोटी रुपयांची चोरी झालेली मालमत्ता परत मिळवलेली आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत चोरी झालेल्या मालमत्तेची विभागनिहाय पुनर्प्राप्ती पाहील्यास तब्बल रू. ९९.२९ लाखाची चोरीची मालमत्ता जप्त करण्यात सोलापूर विभाग आघाडीवर असून ३३ गुन्हे दाखल करण्यात आले व यात एकूण १०२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

मुंबई विभागात सर्वाधिक १६९ प्रकरणे नोंदवण्यात आली असून त्यात २८७ जणांवर कारवाई करण्यात आली आहे व ८.८८ लाख रुपयांची चोरीची मालमत्ता परत मिळवली आहे. भुसावळ विभागात ७७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १५९ कोटी रुपयांची मालमत्ता चोरीला गेली होती व त्यामुळे २३.८० लाखांची मालमत्ता पुनर्प्राप्ती करण्यात यश मिळवले आहे. नागपूर विभागात चोरीच्या मालमत्तेचे ५६ गुन्हे दाखल करण्यात आले असून १७० जणांवर कारवाई करण्यात आली व ४.०९ लाखांची चोरीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

पुणे विभागात चोरीच्या मालमत्तेच्या ३७ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून त्यातून ७८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे आणि २.१० लाख चोरीची मालमत्ता परत मिळवली आहे. मध्य रेल्वेचे, रेल्वे सुरक्षा बलाचे कर्मचारी रोख, दागिने, महत्त्वाची कागदपत्रे तसेच इतर विसरलेलले सामान परत मिळविण्यासाठी आणि अशा ऐवजांच्या कायदेशीर मालकांना ते परत करण्याची यशस्वी सेवा देताहेत.

# मुरूडमध्ये रंगला खेळ पैठणीचा

**मुरूड : प्रतिनिधी**

महेंद्र दळवी सामाजिक फाऊंडेशन व मुरूड जंजिरा पर्यटन महोत्सव समिती २०२३चा मुरूड पर्यटन महोत्सव सुरु झाला असून यामध्ये खेळ पैठणीचा हा विशेष कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

कार्यक्रमात सहभागी होण्यसाठी १५० महिलांनी सहभाग नोंदवला मुरूड शहरासह ग्रामीण भागातील महिलांनी सुधा सहभाग घेतला होता. सिने कलाकार दिगंबर नाईक यांनी या उपस्थित. खेळ पैठणी स्पर्धेला पर्यटक म्हणून आलेल्या ठाणे येथील सुरभी ठाकुर या प्रथम क्रमांक विजेत्या ठरल्या आहेत. त्यांना आमदार महेंद्र दळवी यांच्या शुभ हस्ते मुकुट व पैठणी बहाल करण्यात आला.

द्वितीय क्रमांक राजपुरी ग्रामपंचायतमधील पायल भार्गव चव्हाण, तृतीय क्रमांक राजपुरी ग्रामपंचायत मधील–दुर्गा पुरोशोत्तम मालीम तसेच उत्तेजनार्थ सुदेशना गोलवी. छाया मनोज चौधरी यांना देण्यात आला आहे.


# ऐतिहासिक चौल-रेवदंड्यात जैवविविधतेचाही सुकाळ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल व रेवदंडा या गावांना ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ही गावे जैवविविधतेने नटल्याने थर्टीफर्स्टसाठी पर्यटकांचा ओघ वाढला आहे. या गावांमध्ये काय पिकते आणि काय विकते याचा प्रत्यय गावांच्या नाक्यावर फेरफटका मारल्यावर येतो. ताजा भाजीपाला, फळे, फुले, दवणा–मरवा, पाचू, गुलाब, बकुळ, कवटी चाफा, सोनटक्का ही स्थानिक फुले पर्यटकांना मोहिती घातलात. फुलांचा सुगंध वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण करतो. याशिवाय पांढरी, जांभळी, कोरांटीची फुले अनेकांच्या दारांत फुललेली दिसतात.

नारळ–सुपारी ही नगदी पिके नोव्हेंबरपासून दोन–तीन महिने येते. पिवळ्या केशरी रंगाच्या सुपारीचा पाडा झाला की ही फळे टोपलीत गोळा करून अंगणात याचा ढीग रचला जातो. या सुपारीच्या ताज्या फळांचा मंद सुगंध खूप आल्हाददायक असतो. नारळांच्या पाड्यालाही सुगंध असतो. त्यामुळे संपूर्ण गावात अत्तरांच्या कूपींप्रमाणे मंद सुवास दरवळत असतो.

ऐतिहासिक बंदर असलेल्या चौलची स्वच्छ हवा, वेगवेगळ्या फुलांचा सुगंध गावाविषयी बरेच काही सांगून जातो. भात



आपण रोजच खातो, मात्र जेव्हा शिवारात भाताचे पीक डोलू लागते, तेव्हा मन प्रसन्न–तृप्त होते. वाऱ्यावर डोलणारी शेती पहिली की, हिरवे हिरवे गार गालिचे, हरिततृणांच्या मखमालीचे या बालकवींच्या कवितेतील ओळ ओठांवर आल्याशिवाय राहत नाही.

आम्रवृक्षावरील फुललेला मोहोराचा सुगंधही तसा दुर्मिळच. जांभळा, कांचन, कातर जास्वंद, सीतेचा अशोक अशा देशी–विदेशी वृक्षांबरोबर मेक्सिकोचा अव्हेकॅडो, अमेरिकन पॅशनफ्रुट येथील वाड्यांमधून आंतरपीक म्हणून घेतली जात आहेत. मसाला पिकातील जायफळ, मिरी, दालचिनी येथे पाहायला मिळतात. त्याप्रमाणे विविध प्रजातींचे पशु–पक्ष्यांचे वास्तव्यही याठिकाणी आढळते. खंड्या, हातभार, कोकीळ, हार्नबिल, भारद्वाज, स्वर्गीय नर्तक, गरुड, रानबर्ड, सुगरण शिंपी, तांबट, टिटवी, पावशा आदी पक्ष्यांचा किलबिलाटाने परिसरात नवचैतन्याचा भास होतो. नववर्षाच्या स्वागतासाठी सध्या परिसरात पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले असून ताज्या मासळी खवय्यांकडून ताव मारण्यात येत आहे.

रायगड जिल्हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. येथील जैविक–भौगोलिक बाबींचा विचार करून समुद्रकिनाऱ्याचे सुशोभकरण, बांधबंदिस्ती, पशु–पक्ष्यांचे अधिवासाचे संरक्षण–संवर्धन आवश्यक आहे. येथील जैवविविधतेची भावी पिढ्यांसाठी अनमोल ठेवा आहे, असे जैवविविधता वन्यजीव संरक्षण व व्यवस्थापनाचे समन्वयक डॉ. पूनम कुर्वे यांनी सांगितले.

# सहलींसाठी रायगडला पसंती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील गडकिल्ले, समुद्रकिनारे तसेच धार्मिक स्थळांबरोबरच जैवविविधतेने नटलेले निसर्गसौंदर्य पाहण्यासाठी शैक्षणिक सहली दाखल होत आहेत. विद्यार्थीही या सहलींचा मनमुराद आनंद घेत आहेत.

माणगाव तालुक्यातील पाटणूस परिसरात सोलापूर येथील शाळेची सहल आली होती. निसर्ग अभ्यासक शिक्षक राम मुंडे काही दिवसांपूर्वी सोलापूर–बार्शीतील महात्मा फुले शाळेत पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम घेतला होता. या वेळी विद्यार्थी तसेच शिक्षकांनी रायगड जिल्ह्यातील निसर्गसौंदर्य, अभयारण्य, वनराई पाहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार शाळेचे मुख्याध्यापक गणेश गोटे यांनी निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. मुंडे यांनी, माणगावातील निसर्ग, वनराई, पशु–पक्षी, गिधाडांची घरटी आदींची माहिती दिली.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीसमोर लिहीलेल्या मालक / कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम खरेदी करण्याच्या विचारात आहेत. सदर मालक/ कब्जेदार यांनी आमचे अशिलांकडून ठरलेल्या किंमतीच्या रक्कमेपैकी बयाणा रक्कम स्वीकारलेली आहे व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | गट नं. व उपविभाग | क्षेत्र–हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री. जनार्दन चांगा पाटील | २/२/२ | ०–११–४०<br>पो.ख. ०–००–६०<br>एकुण ०–१२–०० | १.२८ |

वर नमूद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व रजिस्टर्ड खरेदीखत निष्पादीत करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल
दि :- ३१/१२/२०२३

**सही/-**
**श्री. पराग प्रफुल्ल म्हात्रे**
ॲडव्होकेट हाय कोर्ट
व नोटरी भारत सरकार

११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. मो. ९८३३७३८७११

# शीव-पनवेल महामार्गावर पथदिवे बंद

## अपघातांची शक्यता



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरात पामबीच मार्ग, ठाणे-बेलापूर मार्ग, एमआयडीसीमधील रस्ते व शीव-पनवेल महामार्ग अशा अनेक मार्गांवर दिवाबत्तीसाठी पालिकेने पथदिवे लावले आहेत. शीव-पनवेल महामार्गावरील दिवाबत्तीची सुविधा पालिकेने सततच्या नागरिकांच्या तक्रारींमुळे आपल्याकडे हस्तातंरीत करून घेतली व त्यावर जवळजवळ ११ कोटी खर्चातून एलईडी दिवे लावले, परंतू मागील काही दिवसांपासून वाशी उड्डाणपूल ते वाशी टोलनाका या मार्गावर पथदिवे बंद असून अपघातांची शक्यता वाढली आहे.

तत्कालिन आयुक्त डॉ. रामास्वामींपासून पालिका हद्दीतून जाणाऱ्या महामार्गांवरील दिवाबत्ती सातत्याने बंद असल्यामुळे व्यवस्था रस्ते विकास महामंडळाची व लाखोल्या मात्र खाव्या लागत होत्या. तत्कालिन आयुक्त अभिजीत बांगर यांच्या कार्यकाळात महामार्गावरील वाशी ते बेलापूरपर्यंतची दिवाबत्ती पालिकेकडे हस्तातंरीत करण्यात आली आहे. पालिकेने दिवाबत्तीसाठी करोडोंचा खर्च केला आहे. परंतू अनेकवेळा महामार्गावरील पथदिवे उघड-बंद राहत असल्याचे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना अंधारामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

पालिका हद्दीतील बेलापूर ते वाशी या मार्गावर दिवाबत्तीबाबत पाहणी करण्यात येईल तसेच तांत्रिक अडचण असल्यास तत्काळ सुधारणा करण्यात येईल. प्रवाशांना अडचण येणार नाही, याबाबत खबरदारी घेतली जाईल, असे विद्युत विभागाचे अभियंता मिलिंद पवार यांनी म्हटले आहे. वाशी रेल्वेस्टेशनकडून मुंबईकडे जाताना या उड्डाणपुलावर तसेच वाशी उड्डाणपुल ते टोलनाका या परिसरात वीजबत्ती बंद असते. त्यामुळे संबंधित शासकीय आस्थापनांनी याबाबत खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे, असे वाहनचालक दिनेश गोरे यांनी म्हटले आहे.

# घरफोडी करणारा सराईत आरोपी अटकेत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

घरफोडी करणाऱ्या एका आरोपीस वाशी पोलिसांनी अटक केली असून तो कुप्रसिद्ध शिकलगार टोळीचा असल्याचे समोर आले आहे. त्याच्या अटकेमुळे चार गुन्ह्यांची उकल झाली असून १२ लाख ३० हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. आरोपी सराईत असून यापूर्वी हत्येच्या गुन्ह्यात अटक होते. या शिवाय घरफोडी, वाहन चोरी, हत्या, हत्येचा प्रयत्न असे अनेक गुन्हे त्यांच्या नावावर आहेत.

**गुन्हे उघड; मुद्देमाल हस्तगत**

ससपाल सिंग उर्फ पापा तारासिंग कलानी असे अटक आरोपीचे नाव आहे. वाशीत राहणारे अश्विनी प्रसाद यांच्या घरातून याच टोळीने सोन्याचे व चांदीचे दागिने चोरी केले होते. याबाबत फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीनुसार वाशी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंद केला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी एक पथक नेमले होते. या पथकाने तपास करताना गुन्ह्याच्या घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेज तपासण्यात आले व आरोपींची ओळख पटवण्यासाठी नवी मुंबई आणि ठाणे परिसरातील पोलीस ठाण्यातील अभिलेख तपासण्यात आला होता. तसेच आरोपी हे गुन्हा करतेवेळी घटनास्थळी मुखपट्टी, हातमोजे घालून आल्याने त्यांची ओळख पटवणे अत्यंत जिकरीचे होते.

आरोपींनी गुन्हा करताना पांढऱ्या रंगाच्या झेन गाडीचा वापर केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यात एक अडचण होती. आरोपी गुन्हा करण्यासाठी वापरलेली वाहने ही काही अंतरावर गेल्यानंतर बदलत होते. यामुळे माग काढणे अवघड झाले होते, मात्र अत्यंत बारकाईने घटनास्थळावरील तसेच आरोपी पळून गेलेल्या मार्गातील सुमारे ३५० ते ४०० सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली. या प्रयत्नांना यश आले आणि यातील कलानी हा कुठे राहतो त्याबाबत ठोस माहिती मिळाली. तसेच आरोपी शिकलगार म्हणून कुप्रसिद्ध टोळीचा सूत्रधार असल्याचे समोर आले.

आरोपीच्या घराच्या आसपास दोन दिवस वेशांतर करून सापळा रचून अत्यंत शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपींचा पूर्व इतिहास पडताळला असता त्यांनी राजस्थान, गुजरात, राज्यात अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात आर्थिक बुद्धिमत्ता युनिटची स्थापना

## गुन्ह्यांसंदर्भात मार्गदर्शन



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्त, मिलींद भारंबे यांचे आदेशाने व अपर पोलीस आयुक्त दिपक साकोरे आणि पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये आर्थिक गुन्हयांना आळा घालण्याकरीता आर्थिक गुन्हे शाखा नवी मुंबई अंतर्गत आर्थिक बुद्धिमत्ता युनिट (Financial Inteligent Unit)ची स्थापना करण्यात आली आहे.

आर्थिक बुद्धिमत्ता युनिट नवी मुंबई पालीस आयुक्तालय हद्दीत घडणाऱ्या आर्थिक स्वरूपाच्या गुन्हयांची अगोदरच माहीती काढुन त्यांना प्रतिबंध करणे त्याचबरोबर समाजामध्ये याबाबत जनजागृती करणे याबाबत काम करणार आहे. मंथन हॉल, पोलीस उपायुक्त, पनवेल यांचे कार्यालय या ठिकाणी आर्थिक गुन्हयांमध्ये होणाऱ्या फसवणुकीबाबत जनजागृती कार्यक्रमाचे या युनिट मार्फत पनवेल तालुक्यातील सर्व पोलीस पाटलांकरीता आयोजन करण्यात आले होते.

आर्थिक गुन्हयांमध्ये दिवसेदिवस होणारी वाढ व त्याचे गुंतागुंतीचे स्वरूप व त्यामुळे नागरीकांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीत प्रचंड वाढ झालेली आहे. सदरचे गुन्हे हे समाजातील उच्च शिक्षीत व पांढरपेशा व्यक्तीकडून आर्थिक उलाढालीच्या संबंधाने केले जातात. उदा. पॉन्जी स्किमए मनी सर्क्युलेशन, चीट फंड, बँकींग गुन्हे, गृहनिर्माण गुन्हे, जॉब रॅकेटींग इ. अशा प्रकारच्या आर्थिक स्किममधे पैशाची गुतवणुक करताना कोणकोणत्या प्रकारची खबरदारी घ्यावी कोणत्या परवानगी प्राप्त असणे आवश्यक आहे तसेच सदरच्या गुंतवणुक स्किम शासनाच्या पोर्टलवर शासन मान्यता तपासुनच त्यामध्ये गुंतकणुक करावी व यासंदर्भातील फसव्या जाहीरातींना बळी न पडता त्याची सत्यता पडताळावी व सावधगिरी बाळगावी.

कोणाही नागरिकाची आर्थिक फसवणुक झालेली असल्यास किंवा अशा फसव्या योजना निदर्शनास आल्यास त्याबाबत आर्थिक गुन्हे शाखा, नवी मुंबई किंवा जवळच्या पोलीस ठाणेमध्ये तक्रार दाखल करण्याचे आवाहन या वेळी डॉ. विशाल नेहुल, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमात पो. नि. सतिश जाधव, पो.नि. जितेंद्र मिसाळ यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक गुन्हयांविषयी माहीती दिली. सदर कार्यक्रमास एकंदर ४० ते ५० नागरीक, पोलीस पाटील, व महिला उपस्थित होत्या.

# जय श्रीरामच्या जयघोषाने दिवाळेनगरी दुमदुमली

**नवी मुंबई : बातमीदार**

अयोध्यावरून आलेल्या पवित्र अक्षता कलश यात्रेचे नवी मुंबईत भक्तिमय वातावरणात आगमन झाले असून, बेलापूर येथील दिवाळे गावात जय श्रीराम नामाच्या घोषणा देत, शंख नाद करत, पवित्र मंत्रोच्चारांनी व ढोल ताशाच्या गजरात अक्षता कलशाचे स्वागत करण्यात आले.

या वेळी स्थानिक कोळी बांधवानी पारंपरिक वेशभूषा करून मोठ्या जल्लोषाने सहभागी झाले होते. स्वागतासाठी संपूर्ण कोळीवाडा भगव्या पताका आणि सुरेख रांगोळ्यांनी सजला होता. या वेळी अनेक स्थानिक संस्था सहभागी झाल्या होत्या. या अभूतपूर्व कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका आणि शुभ अक्षता घरोघरी वितरित करण्यात येणार आहेत.

अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या भव्य वास्तूच्या गर्भगृहात अक्षतांचे पूजन व अभिमंत्रण करण्यात आले. त्यानिमित्ताने संपूर्ण देशात श्रीराम पूजा मंगल अक्षत: कलश दर्शनासाठी आणला जात आहे. मंगल अक्षता कलशातील अक्षतांचे वाटप १ ते १५ जानेवारी दरम्यान प्रत्येक घरोघरी करण्यात येणार आहे. श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा



सोहळ्यादिनी सर्व नागरिकांनी आपल्या घराच्या देव्हाऱ्यातील देवांवर अक्षता वाहून पूजा करून श्रीरामाचा नाम जप करावा, असे आवाहन देखील समस्थ दिवाळे ग्रामस्थांनी या वेळी केले आहे.

दरम्यान, गेली ७०० वर्ष चाललेल्या संघर्षाला अंतिम स्वरूप प्राप्त होत आहे. अखंड भारतातील उत्तरेपासून दक्षिणे पर्यंत ओळखल्या जाणाऱ्या प्रभू रामचंद्रांच्या मंदिर निर्माण हे राष्ट्र निर्माणाचे प्रतीक व्हावे म्हणून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास यांनी संपूर्ण भारतातील १०० कोटी जनतेला अयोध्याला दर्शनासाठी येण्याचे निमंत्रण अक्षता रुपी पाठवावयाचे ठरविले असून, त्याचे मंगल कलश नवी मुंबई शहरात पोहचले आहे. या मंगल कलशाची दिवाळे गावाच्या वेशीवरून संपूर्ण गाव प्रदक्षिणा घालून हनुमान मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक मोठ्या जल्लोषात काढण्यात आली होती.

या मिरवणुकीला प्रभू श्रीरामाची भव्य प्रतिमा असलेला रथ, ढोल ताशांचा गजर, शंखांचे वादन..'जय श्रीराम'चा जयघोष अशा आनंद आणि उत्साहपूर्ण राममय वातावरणात अयोध्येतील रामलल्लांची मूर्ती असलेल्या मंदिराच्या गर्भगृहात पूजन करून आलेल्या अक्षतांचे पूजन करीत दिवाळे गावाच्या वेशीपासून भव्य मंगल कलश यात्रा काढण्यात आली.

या वेळी मोठ्या संख्येने महिला डोक्यावर अक्षता कलश घेऊन यात्रेत सहभागी झाल्या होत्या. तसेच गावातील प्रत्येक मंदिराच्या ठिकठिकाणी या मिरवणुकीचे भव्य स्वागत करण्यात आले. या वेळी एकविरा मित्र मंडळ यांच्यावतीने मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व राम भक्तांना अल्पाहाराची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

**'जवळच्या मंदिरात आनंदोत्सव साजरा करा'**

प्रत्येक श्रीराम भक्ताच्या घरी जाऊन पूजलेल्या अक्षता, प्रभू श्रीरामांचे छायाचित्र आणि जवळच्या मंदिरातील कार्यक्रमाचे निमंत्रण देण्याची योजना आखण्यात आली आहे. दरम्यान, गावातील प्रत्येक घरापर्यंत १ ते १५ जानेवारी २०२४ पर्यंत संपर्क करण्यात येईल. २२ जानेवारी रोजी सर्व रामभक्तांनी आपल्या राहत्या ठिकाणच्या मंदिरात सकाळी ११ ते १ या कालावधीत भजन, कीर्तन, नामजप करून आनंदोत्सव साजरा करण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे बेलापूर प्रखंड मंत्री स्वरूप पाटील यांनी या वेळी केले आहे.

# नवी मुंबईतील राम मंदिरांमध्ये २२ जानेवारीला दीपोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण भारत देशाचे लक्षकेंद्रित असलेले अयोध्यानगरीतील श्री राम मंदिराची तयारी जोरात सुरू असून श्री रामाचे बाल रूप रामललाचा अभिषेक आणि प्राणप्रतिष्ठापना येत्या सोमवारी (दि. २२) होणार आहे. रामललाच्या या अभिषेक सोहळ्यात भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. या सर्व कार्यक्रमाच्या अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या वतीने श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सवाचे आयोजन करून सोमवारी श्री रामजन्म महाआरती दीपोत्सव सोहळा होणार आहे.

सोहळा सुनील गावस्कर मैदान सेक्टर-१ सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथे मोठ्या थाटा माटात होणार असून त्यानिमित्ताने श्री राम भक्त व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. तसेच नवी मुंबईतील सर्व श्री राम मंदिर व सर्व धार्मिक मंदिरांमध्ये स्थानिक नागरिकांनी मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा करावा, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे.

# नेरूळमध्ये अखंड हरिनाम सप्ताह

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

त्रिमूर्ती मित्र मंडळाच्या वतीने नेरूळ सेक्टर ६ येथील शूरवीर तानाजी मालुसरे मैदानात सलग तेराव्या वर्षी ३१ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे (शिवसेना शिंदे गट) अध्यक्ष दिलीप आमले यांनी कळविले आहे.

प. पू. श्री. १०८ स्वामी मोहनानंद गिरजी महाराज, बदलापूर यांच्या कृपाआशिर्वादाने अणि मार्गदर्शक ह. भ. प. गुरूवर्य पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष गाथा मंदिर, देहू यांच्या कृपाआशिर्वादाने अखंड हरीनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी कलश पूजन आणि विना पूजन करून सोहळ्याला सुरुवात होणार आहे. रात्री ह. भ. प. केशव महाराज शिवणे यांचे सुश्राव्य कीर्तन, सोमवारी रात्री वारकरी भूषण ह. भ. प. सुरेख महाराज कोल्हे यांचे सुश्राव्य कीर्तन, मंगळवारी सायंकाळी ५ ते ७ दरम्यान प्रदर्शिना दिंडी सोहळा तर सायंकाळी युवा कीर्तनकार अर्जुन महाराज सरजिने यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.

या सोहळ्यात बुधवारी ३ डिसेंबर रोजी यांचे सकाळी काल्याचे कीर्तन त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे संगीता आमले यांनी सांगितले आहे. सप्ताहात सहभागी झालेल्या भाग्यवंत पुरुष आणि महिला यांना श्रीमदभगवदगीता तसेच लायसन्स असलेल्या भाग्यवंत पुरुषास एक हेल्मेट तसेच काल्याचे कीर्तन दिवशी भाग्यवान महिलेस एक सोन्याची नथ आणि मानाची साडी देण्यात येणार असून याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे संगीता आमले यांनी कळविले आहे.



# आज वंडर्स पार्क बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नववर्षाचे स्वागत करणेसाठी रविवारी (दि. ३१) संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता सुरक्षा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन नवी मुंबई महापालिकेचे नेरूळ सेक्टर १९ ए येथे असलेले वंडर्स पार्क ३१ डिसेंबरला बंद राहील याची नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

# नवी मुंबईतील व्यावसायिकाचे अपहरण

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोलीमधील बांधकाम व्यावसायीक खिमजी चौधरी यांचे चोरीच्या आरोपावरून अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. चौधरी यांना मारहाण करून चोरी झालेले दागिने व पैसे देण्याची मागणी केली. या प्रकरणी सहा जणांविरोधात अपहरण व मारहाण केल्याचा गुन्हा रबाळे पोलिसांत दाखल केला आहे.

अपहरण झालेल्या चौधरी यांच्या पत्नीचा भागीदारीमध्ये साडीचा व्यवसाय आहे. भागीदार महिलेच्या गुजरातमधील घरी १० लाख ६० हजार रुपयांची चोरी झाल्याचा गुन्हा तेथील पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे. या चोरीच्या संशयावरून चौधरी यांचे २५ डिसेंबरला ऐरोली सेक्टर १६ मधून अपहरण केले. तू गुजरातमध्ये चोरी केली असून पैसे व दागिने परत कर, अशी मागणी केली. त्यांना घेवून महापे एमआयडीसीमध्ये नेले. मारहाण करून गुन्हा कबूल करण्यासाठी दबाव आणला. तेथून भुज जिल्ह्यातील कानपर गावातील मंदिरात नेऊन तेथे देवळात देव अंगात आणण्याचा प्रयत्न केला. नंतर त्यांना सोडून देण्यात आले.

या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यामध्ये सहा जणांविरोधात अपहरण करून मारहाण केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

# सुट्ट्यांमुळे उद्यानातील मिनीट्रेनला गर्दी




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शाळेच्या सुट्या सुरू झाल्या की लहान मुलांना पिकनिक, सहलीचे वेध लागतात. त्यासाठी नवी मुंबईत वाशी येथील मिनी सी-शोर प्रसिद्ध आहे. त्यामुळे अनेकांची पाऊले या ठिकाणी असणाऱ्या मीनाताई ठाकरे उद्यानाच्या दिशेने वळत आहेत. संध्याकाळी गाडीची शिटी वाजताच वाशीतील मीनाताई ठाकरे उद्यानात बच्चे कंपनीचा किलबिलाट पाहायला मिळत आहे.

सुट्टी लागल्यानंतर शहरातील उद्याने, मैदाने यामध्ये बच्चे कंपनीची गर्दी वाढू लागली लागते. उद्यानातील लहान मुलांसाठी असलेल्या खेळण्यांवर बच्चे कंपनीच्या रांगा लागू लागल्या जातात. महत्त्वाचे म्हणजे, पालिकेच्या उद्यान विभागाच्यावतीने काही मोजक्या उद्यानात टॉय ट्रेन बसवण्यात आल्या आहेत. त्यात नेरुळ, वाशी आणि ऐरोलीमधील उद्यानांचा समावेश आहे. त्यामुळे या ट्रेन राइडला मोठा प्रतिसाद असतो.

**शनिवार, रविवारी गर्दी**

मीनाताई ठाकरे उद्यानातील मिनी ट्रेन ५ ते १२ वर्षांच्या मुलांसाठी आहे. एका राइडसाठी फक्त १५ रुपये तिकीट आहे. त्यामुळे ते सर्वांना परवडण्यासारखे आहे. म्हणून येथे मुलांच्या रांगा लागलेल्या असतात. दर शनिवारी व रविवारी सहाशे ते सातशे मुले या सफरीचा आनंद घेत आहेत. तर इतर दिवशी मुलांची संख्या २०० ते ३००च्या घरात असते. सुटीच्या दिवसांत ही संख्या अधिक वाढत आहे.



# सीताफळांची आवक वाढली

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई कृषी उत्पन्न बाजारात सीताफळाची आवक वाढली असून गोल्डन नामक जातीच्या सीताफळाच्या मागणीतही वाढ होत आहे. मोसमी फळ असलेल्या सीताफळाची जानेवारीपर्यंत अशीच आवक राहील, असा अंदाज व्यापाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

सीताफळात गोल्डन सीताफळाची आवक सुरु झाली आहे. रोज अंदाजे ४५० क्विंटलची आवक होत असून मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याची माहिती फळ व्यापारी राहुल डेरे यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील बार्शीमधून सर्वाधिक आवक होत आहे. गोल्डन, सरस्वती या जातींची सीताफळे येत आहेत. ठोक बाजारात ३० ते ४० रुपये किलो तर किरकोळ बाजारात शंभर रुपयांच्या आसपास प्रतिकिलो दर आहेत.



उरण : भाजप युवा नेते सुबोध ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष कौशिक शाह, सोनारीचे प्रभारी सरपंच महेश कडू, दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिरढोण ग्रामपंचायत सदस्य विजय भोपी आदी उपस्थित होते.

## कुमार-मुली (ज्युनिअर) राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# महाराष्ट्र दुहेरी मुकुटाचा मानकरी





**बेमेतरा (छत्तीसगड) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या कुमार व मुलींनी कुमार गटाच्या ४२व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादन केला. कुमार गटाचे हे सलग १८वे व एकूण ३४वे, तर मुलींचे सलग नववे व एकूण २५वे अजिंक्यपद आहे. महाराष्ट्राचा कर्णधार वैभव मोरे (ठाणे) वीर अभिमन्यू आणि सांगलीची सानिका चाफे जानकी पुरस्काराची मानकरी ठरली.

बेमेतरा (छत्तीसगड) येथील अलॉन्स पब्लिक स्कूल बिजाभटच्या मैदानावर शनिवारी (दि.३०) सकाळी झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या मुलींची ओडिशावर २०-१८ अशी मात करताना चांगलीच दमछाक झाली. मध्यंतरापर्यंत ६-१० अशा चार गुणांनी पिछाडीवर असलेल्या ओडिशाच्या आक्रमकांनी महाराष्ट्राच्या संरक्षकांची चांगलीच दमछाक केली. पहिल्या डावात सहा गडी बाद करणाऱ्या ओडिशाच्या आक्रमकांनी दुसऱ्या डावात महाराष्ट्राचे १२ गडी बाद करीत सामन्यात चुरस निर्माण केली होती. अखेर निर्णय डावात महाराष्ट्राने आपला विजय खेचून आणला. महाराष्ट्राच्या अश्विनी शिंदे हिने ४.२०, २.४० मिनिटे संरक्षण व सहा गुण, तर सुहानी धोत्रे हिने सहा बळी टिपले. सानिका चाफे हिने २.३० व २.५० मिनिटे संरक्षणाची बाजू सांभाळावी. ओडीशाच्या अर्चनाने (१.५०, १.४० मि. ४ गुण) तर स्मरणिका (१.३० मि. ४ गुण) यांची अष्टपैलू खेळी अपुरी पडली.

महाराष्ट्राच्या कुमार संघाने कोल्हापूरवर १८-१६ असा एक डाव राखून दोन गुणांनी सहज विजय मिळविला. यात गणेश बोरकर (१.१०, २ मि. संरक्षण व चार गुण) व कर्णधार वैभव मोरे (नाबाद १.१० मि. व ४ मि. संरक्षण व दोन गुण), भरतसिंह वसावे (२, १ मिनिटे संरक्षण), रमेश वसावे (१.४०, १.२० मिनिटे संरक्षण) यांनी सर्वोत्कृष्ट खेळी करीत महाराष्ट्राचा विजय सुकर केला. पराभूत कोल्हापूरच्या विराज घाटगे (१ मि. संरक्षण), शरद घाटगे (२ मिनिटे संरक्षण) केले, मात्र त्यांना इतर खेळाडूंची साथ न मिळाल्याने मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

तत्पूर्वी उपांत्य फेरीत महाराष्ट्रच्या कुमार संघाने कर्नाटकचा ३४-२० असा १५ गुणांनी पराभव केला. मुलींनी दिल्लीवर १८-१० असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळवला. या विजेतेपदाबद्दल दोन्ही संघांचे कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.



## पॉवरलिफ्टर अमृता भगतला 'कांस्य'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

फेडरेशन कप पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच मध्य प्रदेशातील इंदोर येथे झाली. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पदकविजेती रायगडची अमृता ज्ञानेश्वर भगत हिने कांस्यपदक पटकाविले.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने अमृता व आणि तिचे प्रशिक्षक विक्रांत गायकवाड यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई यांनीसुद्धा विशेष अभिनंदन केले.

मुंबई विद्यापीठाच्या झोन क्रमांक तीनच्या स्पर्धेत अमृताने रौप्यपदक मिळविले होते. ही स्पर्धा टिटवाळा गोवेलीतील जीवनदीप कॉलेज येथे झाली.

# रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात शालेय वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन २८ व २९ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेतील विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनासाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व भाजपचे पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी, उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्य निशा नायर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष खांदेकर तसेच शिक्षक व शिक्षकेतरवर्ग उपस्थित होतर.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक संभाजी जाधव यांनी केले. या वर्षी रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी व पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा व विभागस्तरावर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये एकूण १०१ पदके जिंकली असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभाकर जोशी यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली तसेच या वर्षी झालेल्या जिल्हास्तरीय व विभागस्तरीय स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमार्फत क्रीडांगणावर ज्योत फिरवून कार्यक्रमस्थळी अखंडपणे प्रज्वलित ठेवण्यात आली. क्लॅपर वाजवून धावणे या क्रीडाप्रकारास सुरुवात करण्यात आली.

क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक खेळांचा समावेश होता. या खेळांमध्ये जिंकण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ दिसून आली व सांघिक खेळांमध्ये संघभावना व नेतृत्वगुण पहावयास मिळाले. या स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपदक व चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे नियोजन विद्यालयाचे क्रीडा शिक्षक संभाजी जाधव व उच्च माध्यमिक विभागाचे क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांनी केले होते.

## शिवप्रबोधन मंडळ आयोजित कबड्डी स्पर्धा

# श्री विठ्ठल, होतकरू मित्र, जय भारत, छत्रपती शिवाजी महाराज संघ उपांत्यपूर्व फेरीत

**ठाणे : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल क्रीडा, होतकरू मित्र यांनी शिवप्रबोधन मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली, तर जय भारत क्लब, छत्रपती शिवाजी महाराज मंडळ हे संघ महिलात उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाले. ठाणे (प.) येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग महापालिका शाळा क्र.१२०च्या पटांगणात ही स्पर्धा सुरू आहे.

कुमारांच्या सामन्यात श्री विठ्ठल मंडळाने हिंद केसरी मंडळाचा ३७-१२असा सहज पराभव केला. पहिल्या सत्रात लोण देत १८-०५ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या श्री विठ्ठल मंडळाने दुसऱ्या सत्रातदेखील खेळाची गती कायम राखत आपला विजय सोपा केला. तुषार वैती, कार्तिक वडार यांच्या झंझावाती चढाया त्यांना प्रीत विटेकर याची मिळालेली पकडीची योग्य साथ यामुळे हे शक्य झाले. हिंद केसरीच्या शुभम शुक्लाचा प्रभाव पडला नाही.



कुमारांच्या दुसऱ्या सामन्यात होतकरू मित्र मंडळाने चुरशीच्या लढतीत श्री स्वामी समर्थचा प्रतिकार ३६-३१ असा मोडून काढला. साहिल मगर, मयुरेश पोगडे, मितेश चव्हाण यांच्या संयमी खेळाने होतकरूने पूर्वार्धात १५-०९ अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली होती. शेवटी तीच त्यांच्या कामी आली. उत्तरार्धात मात्र श्री स्वामी समर्थच्या प्रितेश खोकराळे, चरण थोरात, शिवराज भिडे यांना सुर सापडला. त्यांनी आक्रमक खेळ करीत तोडीशीतोड उत्तर देत सामन्यात रंग भरला, पण संघाला विजयी करण्यात ते कमी पडले.

महिलांच्या सामन्यात जय भारत क्लबने श्रेया गावंड, ज्ञानेश्वरी कोकणे, समृद्धी महागंडे यांच्या चढाई पकडिच्या खेळाच्या बळावर संकल्प मंडळाचा ६९-०९ असा धुव्वा उडविला. संकल्पची गौरी भोसले बरी खेळली. दुसऱ्या सामन्यात छत्रपती शिवाजीने स्फूर्ती सेवाचा ४४-२९ असा पराभव केला. मध्यांताराला २४-१७ अशी आघाडी घेणाऱ्या छत्रपतीने मध्यांतरानंतरदेखील तोच जोश कायम राखत विजय आपल्या नावे केला. साक्षी पाटील, नम्रता नेने, चिरल कासार यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. दिपाली पागडी, नूतन चव्हाण, श्वेता कदम यांनी कडवी लढत दिली.

दरम्यान, या स्पर्धेला अर्जुन पुरस्कारप्राप्त माया मेहेर यांनी सदिच्छा भेट दिली. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दशरथ पालांडे व सचिव विजय शिंदे यांनी त्यांचा सन्मान केला.


।। चौदावे पुण्यस्मरण ।।

दिनांक - ३१ डिसेंबर २०२३



कै. चंदन रसिकलाल भोईर

(मु.न्हावा, ता. पनवेल)

शोकाकुल

पुत्र : कु. पारस चंदन भोईर,
आई : सौ रचना रसिकलाल भोईर,
वडिल : श्री रसिकलाल जनार्दन भोईर,
आप्तेष्ठ व भोईर परिवार प्रमोद म्हात्रे,
शिवकिर्ती बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, पनवेल.




**मुरुड : येथे सुरू असलेल्या पर्यटन महोत्सवात मॅरेथॉन रंगली. या स्पर्धेला महोत्सवाच्या आयोजक कल्पना पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.** (छाया : सुधीर नाझरे)









## सरावादरम्यान शार्दुलला दुखापत

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारतीय संघाला मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. अष्टपैलू शार्दुल ठाकूर केपटाऊनमध्ये सराव सत्रादरम्यान जखमी झाला. त्याच्या खांद्याला दुखापत झाली असून त्यानंतर त्याला स्कॅनसाठी नेण्यात आले आहे.

वृत्तानुसार शनिवारी (दि. ३०) सराव सत्रात फलंदाजी करताना शार्दुलच्या खांद्याला चेंडू लागला. त्यानंतर त्याच्या दुखापतीचे मूल्यांकन करण्यासाठी त्याला स्कॅनसाठी नेण्यात आले.

अहवालानुसार शार्दुल ठाकूरची दुखापत गंभीर असू शकते आणि ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीत खेळणे त्याच्यासाठी कठीण आहे. फलंदाजी करताना दुखापत झाल्यानंतर शार्दुलने गोलंदाजी केली, मात्र तो अस्वस्थ दिसत होता. शार्दुल केपटाऊन कसोटीत खेळला नाही, तर त्याच्या जागी रवींद्र जडेजाला संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com